# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक २० जून, २०१९ / ज्येष्ठ ३०, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**<br>**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**<br>**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**<br>**(४) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**<br>**(५) रोजगार हमी मंत्री**<br>**(६) पर्यटन व राजशिष्टाचार मंत्री**<br>**(७) विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**<br>**(८) जलसंधारण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६२**

---

### विदर्भ, मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्हयांमध्ये जलाशयातील पाणी साठा कमी झाल्याबाबत

**(१) * १३५२१७ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्हयांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील ११ मोठे प्रकल्प पाणी साठा १ टक्का व ३१ मध्यम प्रकल्प आणि २०९ लघु प्रकल्प पुर्णपणे कोरडे झाले असुन विदर्भातील अनेक छोट्या जलशयांमध्ये पाणी साठा शिल्लक नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भ मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्हयांमध्ये जलसंकट निर्मुलन पर्यायी व्यवस्था शासनाने केली आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन** : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. मराठवाड्यातील मे, २०१९ अखेर ११ मोठ्या प्रकल्पामध्ये १.९४ %,७५ मध्यम प्रकल्पामध्ये १.२७% तसेच ७४९ लघु प्रकल्पामध्ये १.६५% पाणी साठा शिल्लक आहे.

(३) धरणातील पाणी साठा संबंधित जिल्हाधिका-यांच्या निर्देशानुसार प्राधान्याने पेयजल पुरवण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांची दुरुस्ती करणेबाबत

**(२) * १३४९१८ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यात १९४ शाळांपैकी १६६ जिल्हा परिषद शाळांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शाळांची दुरवस्था झाल्याने विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार पन्हाळा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यात एकूण १९४ जिल्हा परिषद शाळा असून त्यापैकी ९१ शाळांची दुरुस्ती प्रस्तावित आहे व १७ शाळा मधील ५२ वर्ग खोल्या धोकादायक आहेत.

ज्या शाळांच्या इमारती धोकादायक व वापरण्यास अयोग्य आहेत अशा इमारतीमध्ये विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी न बसवता इतर ठिकाणी तसेच मोफत सार्वजनिक इमारतीमध्ये बसण्याची व्यवस्था करण्यात आली असून विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा परिषद शाळा दुरुस्तीसाठी रु.६४ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला असून शाळा दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोर्बे (ता.पनवेल, जि.रायगड) धरणाच्या दुरुस्तीच्या प्रस्तावाबाबत

**(३) * १३४९४८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोर्बे (ता.पनवेल, जि.रायगड) धरणाची दुरवस्था झाल्याने दररोज लाखो लिटर पाणी वाया जात असून शेतक-यांच्या भातशेतीचेही नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९७३-१९७४ च्या काळात बांधलेल्या दगडी भिंती असलेल्या धरणाची वेळीच दुरुस्ती न केल्यामुळे धरणाला तडे जावून अतिवृष्टीत बांध फुटून मोठया प्रमाणात जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणाच्या दुरुस्तीकरिता सुमारे २ कोटी ९६ लाखाचा प्रस्ताव सादर केला असून प्रस्तावास मंजूरी न मिळाल्याने धरणाच्या दुरुस्तीच्या कामाला अद्यापही सुरूवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या धरणाची पाहणी शासनाने केली आहे काय व त्यानुसार धरणाची दुरुस्ती करण्याच्या कामाला तात्काळ सुरूवात होण्यासाठी प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

मोर्बे ल.पा.योजनेच्या सांडव्यामधून गळती होत आहे. सदर योजनेतून दरवर्षी सिंचनासाठी व पिण्यासाठी मंजूरीनुसार पाणी पुरवठा करण्यात येतो. परंतु शेतकऱ्यांच्या भातशेतीचे नुकसान होत असल्याबाबत कोणतीही लेखी तक्रार प्राप्त नाही.
(२) नाही.
(३) व (४) सांडव्याच्या गळती दुरूस्तीचे नियोजन असून त्याअनुषंगाने अधिक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे यांनी दि.०३/०८/२०१८ रोजी धरणाची पाहणी केली असून त्यानुसार दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) मतदार क्षेत्रात टाटा हायड्रो प्रकल्पातून पाणी देण्याबाबत

**(४) * १३९१०१ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुळशी (जि.पुणे) येथील राज्य शासनाच्या नियोजित टाटा हायड्रो पावर प्रकल्पातून करमाळा (जि.सोलापूर) मतदार क्षेत्रात पाणी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री व राज्यमंत्री यांचेकडे दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टाटा हायड्रो प्रकल्पातून पाणी भीमा नदी पात्राव्दारे उजनी जलाशयामध्ये आणण्याचे शासनाने धोरण बनविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली व कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

राज्य शासनाने शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१८/(१२६/२०१८)/जसंअ दि. २ ऑगस्ट २०१८ अन्वये कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समूहास वीज निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी टप्प्या टप्प्याने कमी करण्याकरिता अभ्यास करण्यासाठी अभ्यास गट गठीत करण्यात आलेला होता व या अभ्यास गटाचा अहवाल दि.१० मे, २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. या अभ्यास गटाचा अहवालावरील अभ्यास शासन स्तरावर प्रगतीत आहे.

(३) उपरोक्त अभ्यास गटाचे अहवालाबाबत कृष्णा पाणी तंटा लवादाचे निर्णय व सर्वोच्च न्यायालयात न्याय प्रविष्ठ याचिका यांचे अनुषंगाने विधीज्ञ यांचे अभिप्राय तसेच उर्जा विभागाचे अभिप्राय प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील कृष्णूर औद्योगिक वसाहतीमधील वृक्ष लागवडीकरिता मंजूर करण्यात आलेल्या निधीचा गैरवापर झाल्याबाबत

**(५) * १३८५६९ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील कृष्णूर औद्योगिक वसाहतीमध्ये पर्यावरण संतुलनासाठी सन २०१८-२०१९ मध्ये ५४०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्ष लागवडीसाठी ठरवून दिलेल्या कालावधीत वृक्ष न लावता वृक्षारोपण केले असे दर्शवून वृक्षलागवडीकरीता मंजूर करण्यात आलेला निधीचा गैरवापर झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील अहवालानुसार वृक्ष लागवडीसाठी ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार दिनांक ३०.०१.२०१९ रोजी कृष्णूर ओद्योगिक क्षेत्रात ५४०० झाडे लावण्याचे काम पूर्ण झालेले असून झाडांची वाढ चांगली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंगणवाडी सेवा कर्मचा-यांच्या मानधनात वाढ करणेबाबत

**(६) * १३५३३२ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.राहूल पाटील**

**(परभणी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविकांनी त्याच्या न्याय मागण्यासाठी दिनांक ११ डिसेंबर, २०१८ व १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदानात आंदोलने केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्यप्रदेश, तेलंगणा, केरळ, दिल्ली, तामिळनाडू व आंध्रप्रदेश या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात ३०००/- रुपये इतके कमी मानधन आंगणवाडी व बालवाडी कर्मचा-यांना देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी सेविकांच्या मानधनवाढी संदर्भात राज्य शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित असून याच संदर्भात केंद्र शासनाने राज्य शासनास देण्यात आलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने प्रलंबित प्रस्तावार शासनाने अद्यापर्यंत निर्णय घेतला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणी संदर्भात मा.मुख्यमंत्री यांनी अंगणवाडी संघटनेच्या पदाधिका-यांन समवेत दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत अंगणवाडी सेविकांच्या मागण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अंगणवाडी सेवा कर्मचा-यांच्या मानधनवाढ व इतर मागण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) एकात्मिक बाल विकास सेवा योजना हया केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका/ मदतनीस/ मिनी अंगणवाडी सेविका हे मानधनी कर्मचारी कार्यरत आहेत.

अंगणवाडी सेविका / मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका यांना दि.२३/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये त्यांच्या मानधनात वाढ करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने दि.०१/१०/२०१८ पासून केलेली मानधनवाढ मंजूर करण्याची बाब विचाराधीन आहे.

-----------------

## मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व) येथील आरे कॉलनी, नागरी निवारा, आयटीपार्क येथील डोंगरावरील जंगलामध्ये लागलेल्या आगीबाबत

**(७) * १३५३५० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व) येथील आरे कॉलनी, नागरी निवारा, आयटीपार्क येथील डोंगरावरील जंगलामध्ये दिनांक ३ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागल्याने दुर्मिळ वनसंपदा व वन्यप्राणी यांचे नुकसान झाल्याप्रकरणी मा.पर्यावरण मंत्री यांनी दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास चौकशीचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात अवैध वृक्षतोड सुरु असल्याच्या तक्रारी पर्यावरण प्रेमी यांनी वारंवार महानगरपालिका व वन विभागाकडे केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार वनसंपत्तीचे आगीपासून व अवैध वृक्षतोडीपासून रक्षण करणे कामी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) मौजे मालाड, सर्वे क्र.२३९/१पै. मधील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या शेजारी खाजगी जमिनीत दि.०३.१२.२०१८ रोजी आग लागल्या प्रकरणी सविस्तर चौकशी करण्याचे आदेश शासनाकडून देण्यात आले आहेत.

सदर आग लागलेले क्षेत्र हे खाजगी क्षेत्र असून या आगीमुळे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे वनक्षेत्र बाधीत झालेले नसून कोणत्याही प्रकारच्या वन्यप्राण्यास इजा झाल्याची बाब निदर्शनास आली नाही. प्राथमिक चौकशीप्रमाणे सदर क्षेत्र मोठे असून या क्षेत्रामध्ये कोरड्या नाल्यांमधून विनापरवाना घुसखोरी करणाऱ्या समाज कंटकाकडून सदर आग लावली गेली असल्याची शक्यता आहे.

वनसंपत्तीचे आगीपासून व अवैध वृक्षतोडीपासून रक्षण करणेकामी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :-

- आगप्रतिबंधक जाळरेषा घेण्यात आल्या आहेत.
- आगरक्षक वनमजूर (दिवस व रात्रपाळी) ठेवण्यात आले आहेत व ते नियमित आगीवर सनियंत्रण ठेवित आहेत.
- मौक्याचे ठिकाणी वनसंरक्षणार्थ कूटी उभारण्यात आले आहेत.
- वनकर्मचाऱ्यांची व आग रक्षक यांची दिवस व रात्र गस्त चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वारणा नदीवर बांधण्यात आलेल्या चांदोली धरण ते सांगलीपर्यंतचे कोल्हापूर पध्दतीचे नऊ बंधाऱ्यांची झालेली दुरवस्था

**(८) * १३९५८४ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारणा नदीवर बांधण्यात आलेल्या चांदोली धरण ते सांगलीपर्यतचे कोल्हापूर पध्दतीचे नऊ बंधाऱ्यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधा-याच्या मध्यभागी असलेले तीन प्रस्तंभ तुटल्याने येत्या पावसाळयात अन्य प्रस्तंभांना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार बंधाऱ्यांची तात्काळ दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

वारणा प्रकल्पांतर्गत वारणा नदीवर, वारणा धरण ते कृष्णा नदी संगमापर्यंत ९ को.प.बंधारे असून त्यापैकी ५ को.प.बंधाऱ्यांची दुरस्ती करणे आवश्यक आहे.

(२) अंशत: खरे आहे.

वारणा नदीवरील एकूण ९ को.प.बंधाऱ्यांपैकी तांदुळवाडी व चावरे या दोन को.प.बंधाऱ्यांचे प्रस्तंभांचे दगडी बांधकाम तुटले आहे.

(३) चावरे व मांगले-सावर्डे या को.प.बंधाऱ्यांची पाहणी मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, पुणे यांनी दि.३०/०३/२०१९ रोजी केली आहे. उर्वरीत तांदुळवाडी, खोची व दानोळी या बंधाऱ्यांची पाहणी कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (उत्तर) कोल्हापूर यांनी मार्च, २०१९ मध्ये केली आहे.

पाहणीमध्ये सदर बंधाऱ्यांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याचे आढळून आले आहे.

(४) सदर बंधाऱ्यांच्या दुरूस्तीसाठी विस्तार व सुधारणा / विशेष दुरूस्ती अंतर्गत करावयाच्या कामांच्या प्राधान्यक्रमास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ९९ व्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावरून प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हयातील तावरजा मध्यम प्रकल्पाची दुरुस्ती करणेबाबत

**(९) * १३९३२२ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील तावरजा मध्यम प्रकल्पाच्या गेट व सांडव्यातून पाण्याची होत असलेली गळती थांबविण्यासाठी गेट व सांडव्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मध्यम प्रकल्पाच्या गेट व सांडव्याच्या दुरुस्तीसाठी निधी मंजुर करण्यासह तातडीने दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, खरे आहे.

(२) कायमस्वरुपी उपाययोजना करणेच्या दृष्टीने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेमार्फत सविस्तर संकल्पन तयार करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सविस्तर संकल्पन आराखडे प्राप्त होताच त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन मान्यता देण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तारकर्ली (जि.सिंधूदुर्ग) येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सुरु केलेला हाऊस बोट प्रकल्प नव्याने सुरु करणेबाबत

**(१०) * १३५५९३ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड**

**(अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारकर्ली (जि.सिंधूदुर्ग) येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सन २००७ मध्ये हाऊस बोट प्रकल्प सुरु केला असून २ कोटी रुपये खर्च करुन २ हाऊस बोटी खरेदी करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत हा प्रकल्प बंद अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प नव्याने सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) महामंडळाकडे हाऊसबोटींच्या पार्किंगकरीता तसेच पावसाळी हंगामात हाऊसबोटी पाण्याबाहेर काढून ठेवण्याकरीता जागा व ड्रायडॉक उपलब्ध नाही. त्यामुळे हाऊसबोटी वर्षानुवर्ष पाण्यात असल्याने तसेच हाऊसबोटींचा तळभाग हा लाकडी असल्याने कमकुवत होऊन हाऊसबोटींच्या तळभागास छिद्रे पडून दुरुस्तीकरणावर खर्च होत होता. तसेच हाऊसबोटींच्या प्रचलन व देखभालीवर मोठया प्रमाणात खर्च होत असल्याने महामंडळाने हाऊसबोटींचे प्रचलन खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने करणेबाबत निर्णय घेतला.

त्याअनुषंगाने, महामंडळाने हाऊसबोटी “जश्या आहेत त्या स्थितीत” खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने चालविणेसाठी खाजगी संस्थेची नेमणूक करण्याकरीता निविदा जाहिरात दि.०१.११.२०१७ रोजी (पहिली) व दि.२२.२.२०१८ रोजी (दुसरी) वृत्तपत्रात तसेच शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली. तथापि, एकही निविदा प्राप्त झाली नाही.

एकत्रित निविदेस प्रतिसाद लाभत नसल्याने महामंडळाचे तारकर्ली, ता.मालवण येथील ३ हाऊसबोटी, दाभोळ जि. रत्नागिरी येथील १ हाऊसबोट व बाणकोट जि. रत्नागिरी येथील १ हाऊसबोट याप्रमाणे प्रत्येक ठिकाणच्या स्वतंत्र निविदा तयार करुन दि.२४.०१.२०१९ रोजी (तिसरी) शासनाच्या संकेतस्थळावर तसेच वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार, प्रत्येक स्थळाकरीता १ याप्रमाणे निविदा प्राप्त झाली आहे. तिसऱ्या निविदेनुसार प्राप्त झालेल्या निविदा उघडण्यात आल्या असुन संस्थेची नेमणूक करणेबाबत पुढील कार्यवाही महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सर जे. जे. रुग्णालयात अद्ययावत यंत्र सामुग्रीसह सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११) * १३६४४७ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयातील रक्तातील दुर्मिळ आजार, संसर्ग तसेच कॅन्सरच्या निदानासाठी वापरण्यात येणा-या एक कोटी पाच लाख रूपयांच्या फ्लोसायटोमीटर आणि इम्युनोहिस्ट्रकेमिस्ट्री या वैद्यकिय चाचण्यांसाठी वापरल्या जाणा-या दोन मशिन्स मागील पाच वर्षापासून विनावापर असल्याने अनेक गरजू रूग्णांना स्वखर्चाने वैद्यकिय चाचण्या कराव्या लागत असल्याची बाब दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, याच रुग्णालयातील एकूण ८५ व्हेंटीलेटर पैकी १५ व्हेंटीलेटर बंद असून यापैकी १० व्हेंटीलेटर अतिदक्षता विभागातील असल्याची बाब दिनांक २६ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या रुग्णालयात रक्तदानासाठी येणा-या दात्यांना तसेच रुग्णांना देण्यात येणाऱ्या खाटा या तुटलेल्या असून खराब चादरी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार जे.जे.रुग्णालयातील रुग्णांना होणाऱ्या गैरसोयीस जबाबदार असणाऱ्या संबधितांवर कारवाई करण्यासह रुग्णालयातील वैद्यकिय चाचण्यांसाठी वापरल्या जाणा-या दोन मशिन्स कार्यान्वित करुन बंद असलेले व्हेंटीलेटर दुरुस्त करण्याबाबत वा नवीन व्हेंटीलेटर खरेदी करण्याकरिता व रुग्णालयात रक्तदात्यांना तसेच रुग्णांना योग्य सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) फ्लोसायटोमीटर या यंत्राच्या बाबतीत खरे आहे. इम्युनोहिस्ट्री केमिस्ट्री यंत्राचा परिपूर्ण पुरवठा न झाल्याने सदर यंत्र प्रस्थापित करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) फ्लोसायटोमीटर व इम्युनोहिस्ट्री केमिस्ट्री या यंत्रांबाबत संचालनालयामार्फत समिती गठीत करुन चौकशी करण्यात येत आहे.

याविषयी फ्लोसायटोमीटर यंत्रसामुग्री कार्यान्वित करणे शक्य आहे किंवा कसे, ही बाब तपासण्यात येत आहे. इम्युनोहिस्ट्री केमिस्ट्री या यंत्रसामुग्रीचा परिपूर्ण पुरवठा झालेला नसल्याने कार्यान्वित करता येणार नाही. सदर रुग्णालयातील विविध विभागात ८० व्हेंटिलेटर व्यवस्थितरित्या कार्यरत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिरवली-येलोदेवाडी (ता.चिपळुण, जि.रत्नागिरी) येथील धरणासाठी जमिनी संपादित केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला अदा करणेबाबत

**(१२) * १३७१३८ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरवली-येलोदेवाडी (ता.चिपळुण, जि.रत्नागिरी) येथे होणा-या धरणासाठी नारदखेरकी, देवखेरकी येथील शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणासाठी ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत त्या प्रकल्पग्रस्त शेतक-यांना जमिनीचा मोबदला अद्यापही देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार धरणासाठी ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत त्यांना तात्काळ जमिनीचा मोबदला अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) नाही.

धरणासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट पध्दतीने खरेदी करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साबळेवाडी (ता.जि.सातारा) ग्रामपंचायतीत झालेला गैरव्यवहार

**(१३) * १३९३०५ श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (सातारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साबळेवाडी (ता.जि.सातारा) या ग्रामपंचायतीमध्ये सन २०१० ते २०१६ या कालावधीत सुमारे २१ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे सातारा जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहार प्रकरणी तत्कालीन सरपंच आणि ग्रामसेवक यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याचे आदेश सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सातारा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार तत्कालीन सरपंच आणि ग्रामसेवक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ग्रामपंचायत साबळेवाडी यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता २०११ मधील नियम ५४ प्रमाणे, ग्रामपंचायतीने केलेल्या कामांसाठी निविदा मागविल्या नाहीत, नियम ५६ प्रमाणे जाहिर निविदा न मागविता मक्तेदारमार्फत कामे केलेली आहेत, तसेच नियम ५७ प्रमाणे अंदाजपत्रक, तांत्रिक मंजूरी व मूल्यांकन प्रमाणपत्र व नियम ५९ प्रमाणे मोजमाप पुस्तिकेमध्ये मोजमापे नोंदविण्यात आलेली नाहीत, पोटनियम ३ प्रमाणे कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक फलक लावलेले नाहीत, अशा प्रकारे सुमारे २१ लक्ष रु.खर्चामध्ये अनियमितता झालेली असल्याचे सकृत दर्शनी दिसून येत आहे, हे खरे आहे.

(२), (३) व (४) होय.

सन २०१२-२०१७ या कालावधीत तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक ग्रामपंचायत साबळेवाडी यांनी वरील कामांच्या बाबतीत आर्थिक व प्रशासकीय अनियमितता केलेचे सकृत दर्शनी दिसून आल्याने, तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सुचना, गटविकास अधिकारी पंचायत समिती सातारा यांना जिल्हापरिषदेने दिनांक २५/०२/२०१९ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत.

तथापि तत्कालीन सरपंच ग्रामपंचायत साबळेवाडी यांनी, दिनांक २/३/२०१९ व तत्कालीन ग्रामसेवक श्रीमती व्ही.बी.पवार यांनी दि.५/३/२०१९ अन्वये, त्यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी संधी दयावी, अशी मागणी केलेने व त्यांना त्यांची बाजू मांडणेसाठी संधी मिळावी म्हणून, दि. ६/३/२०१९ च्या पत्रान्वये, गुन्हा दाखल करणे तात्पुरते स्थगित करुन व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.) जि.प.सातारा यांनी सुनावणी घेऊन त्यांची बाजू ऐकून घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि.प.सातारा यांनी दि.५/३/२०१९, दि.१३/५/२०१९ व दि.३/६/२०१९ रोजी सुनावण्या घेतल्या असून त्या आधारे त्यांचेविरूध्द पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

तसेच तत्कालीन ग्रामसेवक श्रीमती व्ही.बी.पवार ग्रामपंचायत साबळेवाडी यांना जिल्हा परिषदेच्या दिनांक ०४/०९/२०१८ च्या कार्यालयीन आदेशान्वये निलंबित करणेत आले आहे व त्यांचे विरुध्द दि. १४/५/२०१९ अन्वये त्यांची खाते चौकशी सुरु करणेत आलेली आहे.

-----------------

## पुणे येथील खडकवासला धरण ते फुरसुंगी दरम्यानच्या कालव्याजवळील जमिनी वृक्षारोपणाच्या नावाखाली बळकाविल्याबाबत

**(१४) * १४०६७१ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील खडकवासला धरण ते फुरसुंगी दरम्यानच्या २८ किलोमीटरच्या कालव्याजवळील जमिनी जलसंपदा विभागाच्या मालकीच्या असून काही बिल्डर आणि व्यावसायिकांकडून वृक्षरोपणाच्या नावाखाली त्या जमिनी बळकाविल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगणे परिसरातील सर्व्हे क्र. २३ येथील विश्रांतीनगर ते आनंद्विहार दरम्यान कालव्याजवळील हजारो झाडे बनावट परवानगी घेऊन ती तोडून तेथे मातीचा भराव टाकला जात असल्याने कालव्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृक्षरोपणाच्या उपक्रमाचा गैरवापर करून भूखंडमाफियांनी या जमिनीवर स्टॉल, हॉटेल, दुकाने उभारली आहेत व स्वमालकीच नर्सरी तयार करण्याचे कामही सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वृक्षरोपणाच्या उपक्रमाचा गैरवापर करुन उक्त जमिनी बळकाविणाऱ्या दोषींवर कारवाई करण्यासह सदर जमिनी संरक्षित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

शासननिर्णय जलसंपदा विभाग क्र.संकिर्ण-२०१६/ प्र.क्र.१०९/ लाक्षेवि. (आस्था), दि.०६-१२-२०१६ मधील मुद्दा क्र. ६ अन्वये सदर जमिनी जलसंपदा विभागाने जमिनींचा मालकी हक्क आबाधित ठेवून विभागीय स्तरावरून वृक्षारोपणासाठी काही सामाजिक संस्थांना परवानगी दिलेल्या आहेत.
(२) नाही.

हिंगणे परिसरातील सर्व्हे क्र.२३ येथील विश्रांतीनगर ते आनंद विहार भागाला कार्यकारी अभियंता यांनी क्षेत्रिय अधिकाऱ्यांसमवेत दि. २९.०५.२०१९ रोजी क्षेत्रीय भेट दिली असता त्याठिकाणी भराव टाकून कालव्याला कोणताही धोका निर्माण झालेला असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

सदरच्या ठिकाणी कालव्याच्या निरीक्षण पथावर कचरा कुंडी झालेली होती. तसेच काही जंगली झाडे निरीक्षण पथावर वाढल्याने कालव्याच्या भरावाला धोका झालेला होता. त्यामुळे कालव्याच्या निरीक्षण पथावरुन कालवा देखभाल दुरुस्तीसाठी जाणे-येणे शक्य होत नव्हते. मा.मुंबई, उच्च न्यायालयाने गठित केलेल्या नविन मुठा उजवा कालवा चौकशी समितीने दि. १९.१२.२०१८ रोजी क्षेत्रीय भेटीच्यावेळी दिलेल्या सुचनांनुसार कालव्याचा सेवापथ व निरीक्षण पथ हा कालवा देखभाल दुरुस्तीसाठी खुला ठेवणे आवश्यक होते. त्यानुसार त्या ठिकाणी जंगली झाडे तोडुन तसेच कचरा कुंडी काढून कालव्याच्या निरीक्षण पथावरील भरावाची दुरुस्ती जलसंपदा विभागाद्वारे करण्यात आलेली आहे.
(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आसनगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील टाकीपतार प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये बांधण्यात आलेल्या माहेरघर व मिटिंग हॉलच्या बांधकामाबाबत

**(१५) * १३८९७९ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसनगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील आदिवासी अतिदुर्गम भागातील टाकीपतार प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये बांधण्यात आलेल्या माहेरघर व मिटिंग हॉलचे काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे असताना शहापूर पंचायत समितीच्या बांधकाम विभागाने कंत्राटदारास पूर्ण देयक दिले असल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समिती बांधकाम शाखा अभियंताविरुध्द तक्रार दाखल करुन कंत्राटदाराला देण्यात आलेल्या देयकाची चौकशी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाढते अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठी निष्काळजीपणे वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करणेबाबत

**(१६) * १३६९१५ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढते अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठी निष्काळजीपणे वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने त्यांचा वाहन परवाना तीन महिन्यांसाठी रद्द करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी राज्यात सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार राज्यात १४ हजार वाहनचालकांचे परवाने रद्द करण्यात आले असले तरीही अदयापही मुंबई शहर वगळता ठाणे जिल्हयात प्रामुख्याने डोंबिवली, कल्याण तसेच मुंबईपासून लांबच्या ठिकाणी या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे दिनांक १० मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात उक्त नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यात निलंबित करण्यात आलेले १४००० वाहन परवाने हे केवळ मुंबईतील नसून पूर्ण राज्यातील आहेत. ठाणे जिल्हयातील डोंबिवली व कल्याण या ठिकाणी माहे जानेवारी २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीत विविध गुन्हयांसाठी १८९ अनुज्ञप्तींचे निलंबन करण्यात आले तर माहे जानेवारी २०१९ ते मे २०१९ या कालावधीत विविध गुन्हयांसाठी २८० अनुज्ञप्तींचे निलंबन करण्यात आले.त्यामुळे मुंबईपासून लांबच्या ठिकाणी नियमांचे पालन होत नसल्याची बाब, ही खरी नाही.

(३) राज्यात माहे जानेवारी २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीत राज्यात एकूण १३,४७४ वाहनधारकांची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आल्या आहेत. यापैकी मुंबई शहर व उपनगरात ४२ अनुज्ञप्तींचे निलंबन झाले आहे. तर उर्वरित राज्यात १३,४३२ अनुज्ञप्तींचे निलंबन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे राज्यात माहे जानेवारी २०१९ ते मार्च, २०१९ या कालावधीत एकूण १२,५५८ वाहनधारकांची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आल्या आहेत. यापैकी मुंबई शहर व उपनगरात ८४५ अनुज्ञप्तींचे निलंबन झाले आहे. तर उर्वरित राज्यात ११,७१३ अनुज्ञप्तींचे निलंबन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मांगरुळ (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) या गावाजवळील वन विभागाच्या जमिनीवर लावण्यात आलेल्या वृक्षांचे आगीमुळे झालेले नुकसान

**(१७) * १३८२२६ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांगरुळ (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) या गावाजवळील वन विभागाच्या सुमारे ८० एकर जमिनीवर सन २०१७-१८ या वर्षात लोकसहभागातून सुमारे १ लाख वृक्ष लावण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वृक्षांच योग्य प्रकारे संगोपन व्हावे याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी स्वखर्चाने लाखो रुपये खर्च करुन बोअर वेल, पाण्याच्या टाक्या आणि पाईपलाईनची व्यवस्था केलेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वृक्षांचे सरंक्षण व्हावे यासाठी वनखात्याने संरक्षण भिंत बांधून टेकडीवर वन खात्याची चौकी उभारण्यात आली असून कायमस्वरुपी वन रक्षकांची नियुक्ती करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी वन विभागाकडे लेखी स्वरुपात केलेली असतांनाही दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास ८० एकर जमिनीवरील जवळपस ७० हजार वृक्षांचे आग लागून नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वन खात्याचे उपमुख्य वन संरक्षक आणि बदलापूर - अंबरनाथ रेंजचे आरएफओ यांच्या दुर्लक्षामुळे आग लागून वृक्षांचे नुकसान झाले अशी तक्रार स्थानिक लोकप्रतिनीधीनी मा.मुख्यमंत्री, मा.वने मंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे तसेच जिल्हाधिकारी व मुख्य वन संरक्षक यांच्याकडे करुन याबाबत चौकशी करुन संबधित दोषीवर कारवाई करावी अशीही मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्याअनुषंगाने शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : (१) मांगरुळ, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथे मांगरुळ स.नं.१०६,१३ व वसार ११३ मध्ये सन २०१७ च्या पावसाळयात लोक सहभागातून ४० एकर क्षेत्रात ४०,००० रोपे लागवड करण्यात आली होती.

(२) सदर वृक्षांचे योग्य प्रकारे संगोपन व्हावे यासाठी लोकप्रतिनिधी यांनी मार्गदर्शन करुन व पुढाकार घेऊन सदर ठिकाणी बोअरवेल, पाण्याची टाकी व रोपांना पाणी देण्यासाठी पाईपची व्यवस्था करण्यात आली होती.

(३) सदर वृक्षांचे संरक्षण व्हावे यासाठी वनखात्याने संरक्षण भिंत बांधलेली नाही. परंतू रोपवन सभोवार चेनलिंक फेन्सींग करणे कामासाठी निविदा मंजूर करुन ई-निविदा धारकास कार्यरंभ करणेकामी दिनांक २४.५.२०१९ रोजी आदेश देण्यात आला आहे.

सदर रोपवन कामी ४ रखवालदार रोजंदारीवर ठेवण्यात आले असून त्यांच्यासाठी रोपवन क्षेत्रात मध्यावर चौकी बांधण्यात आली आहे. तसेच कायमस्वरुपी वनरक्षक, बोहोनोली रोपवनाची देखभाल करीत आहेत. दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजी रोपवन क्षेत्रात आकस्मिक वणव्यामुळे क्षेत्रातील १२६३३ रोपांना आगीची झळ लागली होती.

(४), (५) व (६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी चौकशी केली असून सदर प्रकरणी जबाबदार असलेले वनक्षेत्रपाल, वनपाल व वनरक्षक यांना दिनांक ५.३.२०१९ अन्वये भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत त्यांना सक्त ताकीद देण्यात आली असून त्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली आहे.

यात्प्रकरणी वनक्षेत्रपाल, बदलापूर, यांचेविरुध्द लोकप्रतिनिधींचा रोष निर्माण झाल्यामुळे त्यांचेकडून वनक्षेत्रपाल, बदलापूर या पदाचा कार्यभार दिनांक २०.१२.२०१८ चे आदेशान्वये तात्काळ काढून घेण्यात आला व सदरचा कार्यभार वनक्षेत्रपाल, मुरबाड यांचेकडे तात्काळ प्रभावाने अतिरिक्त स्वरुपात सोपविण्यात आला.

-----------------

## खातिवली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील भातसा कालव्याची झालेली दुरवस्था

**(१८) * १३५३२० श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खातिवली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील भातसा कालव्याला मोठे खिंडार पडल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले असल्याचे दिनांक १२ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भातसा कालवा विभाग कार्यालयाच्या दुर्लक्षितेमुळे व देखभाल दुरुस्ती न केल्याने कालव्याला खिंडार पडल्याची तक्रार स्थानिक नागरीकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यात्प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त कालवा दुरुस्त करण्यासह संबंधीतांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) दि.१२/०३/२०१८ रोजी भातसा उजवा कालव्यास कि.मी.२९/००० येथे भगदाड पडले, हे खरे आहे. तथापि, कालव्यातून वाहून गेलेले पाणी नाल्याद्वारे भातसा नदीस जावून मिळाले असून पुढे पिसे बंधारा येथे अडवले गेले आहे.

(२) स्थानिक नागरीकांनी आरोप केला आहे हे खरे आहे.

तथापि, सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या पाईप मोरीचे सेवापथाकडील भरावाच्या खाली दोन ओळीमध्ये असलेले एकूण पाच सिमेंट पाईप संपृक्त झालेल्या मातीच्या दाबामुळे पूर्णपणे फुटून कालवा क्षतिग्रस्त झाला आहे.

सदर पाईप हे साधारण ४० वर्षे जूने झालेले असून पाईपामध्ये वापरण्यात आलेल्या लोखंडी सळ्या गंजल्यामुळे पाईपांची दाब घेण्याची क्षमता कमी झाली व त्यामुळे सदर पाईप आकस्मितपणे रिक्तन होऊन पूर्णपणे फुटलेले आहेत.

(३) होय.

(४) दि.१६/०३/२०१९ रोजी यांत्रिकी विभागाच्या यंत्र सामुग्रीचा वापर करून सदर भगदाड तातडीने बुजविण्यात आले व सिंचन हंगाम सुरू असल्याने तात्पुरती दुरूस्ती करून कालव्याचा पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. सन २०१९-२० च्या प्रापणसूचीत या कामाचा समावेश करण्यात आला असून कायमस्वरूपी दुरूस्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर घटना आकस्मित असल्यामुळे त्यास कोणीही जबाबदार नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## झरी-वडगाव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) ग्रुप ग्रामपंचायतीत रोजगार हमी योजनेंतर्गत केलेल्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१९) * १३७२३३ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी-वडगाव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) ग्रुप ग्रामपंचायतीत रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामसुधार, स्वच्छता, पाणी पुरवठा व सिंचन विभागाने विविध कामे केली असून या कामात निधीचा अपहार करण्यासाठी संबधित अधिकाऱ्यांनी बनावट जॉबकार्ड तयार करून त्या आधारे मृत व बनावट

व्यक्तींच्या नावाचा वापर करून रोजगार हमी योजनेच्या कामात किमान दोन कोटी रूपयांचा अपहार केला असल्याचे दिनांक ७ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावाची लोकसंख्या ६०० असतांना १३६८ लोकांच्या नावाने बनावट जॉबकार्ड तयार करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार दोषीं अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) सदर प्रकरणी गुन्हा नोंद झाला असून तपास सुरु आहे.
(३) व (४) चौकशी अहवालानुसार तत्कालीन ग्रामसेवक यांना दि.२६/११/२०१४ च्या आदेशान्वये निलंबीत करण्यात आले होते व त्यांच्याविरुद्ध खातेनिहाय चौकशी करण्यात आली होती. सदर प्रकरणी त्यांचेविरुध्द एक आरोप अंशत: सिध्द झाल्याने यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडयांमध्ये आठ लाख बनावट लाभार्थी विद्यार्थी असल्याबाबत

**(२०) * १३५५४९ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा),**

**डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एक लाखांहून अधिक अंगणवाड्यांमध्ये एकूण ६१ लाख विद्यार्थी असल्याची नोंद असून त्यापैकी आठ लाख विद्यार्थी हे बनावट लाभार्थी असल्याने अंगणवाड्यांमधून दिल्या जाणा-या पोषण आहारात दररोज तब्बल ६४ लाख रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याची माहिती केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाने राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागास माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाड्यांमध्ये आठ लाख बनावट लाभार्थी असलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेण्याबाबत केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाने राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थी विद्यार्थ्यांची नावे आधार कार्डाशी जोडले गेले असल्याने बनावट लाभार्थी असलेल्या विद्यार्थ्यांनी नावे निदर्शनास आली तथापि माहे जुलै, २०१८ पासून लाभार्थी असलेल्या विद्यार्थ्यांची नावे आधार कार्डासोबत जोडण्याची प्रक्रिया अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नसल्याने आणखी बनावट लाभार्थी असलेल्या विद्यार्थ्यांची नावे उघडकीस येण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(५) असल्यास, त्यानुसार अंगणवाडयामधील बनावट लाभार्थी विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासह बनावट लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या रोखण्याबाबत व शालेय पोषण आहारात होणारे गैरव्यवहारास आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत माहे फेब्रुवारी, २०१९ च्या मासिक प्रगती अहवालावरुन राज्यात एकूण ११०४८६ अंगणवाडया मंजूर असून त्यापैकी १०९६०० अंगणवाडया कार्यरत आहेत. सदर अंगणवाडयांमध्ये एकूण ६ महिने ते ६ वर्षाचे ६६१८१४८ एवढे नोंदणीकृत लाभार्थी आहेत, तर गर्भवती, स्तनदा माता १०८३२२४ इतके नोंदणीकृत आहेत. पोषण आहाराचे लाभार्थी ६ महिने ते ६ वर्षाचे ५१५११०९ एवढे आहेत तर गर्भवती, स्तनदा माता ९७११९० इतके आहेत. ६ महिने ते ६ वर्षाचे बालके व गर्भवती स्तनदा माता मिळून ६१२२२९९ एवढया लाभार्थ्यांना प्रत्यक्ष पोषण आहाराचा लाभ देण्यात येत आहे. त्याशिवाय SAG योजनेंतर्गत २४,४७८ किशोरवयीन मुलींना THR चा लाभ देण्यात येत आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत मासिक प्रगती अहवाल ऑनलाईन पद्धतीने प्रकल्प कार्यालयात भरण्यात येतो. सदर अहवाल भरतांना अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्षरित्या लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या नोंदविण्यात येते त्यामुळे महाराष्ट्र राज्यात एकात्मिक बाल विकास योजने अंतर्गत कोणत्याही प्रकारचे बोगस लाभार्थी नाहीत.

(२) नाही.

फक्त लाभार्थ्यांची आधार नोंदणी करुन लाभार्थ्यांना आधार लिंकिंग करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) नाही.

लाभार्थ्याची आधारकार्डची जोडणीचे काम सुरु असून अद्यापपर्यंत कोणतेही बनावट लाभार्थी आढळून आलेली नाहित. सद्य:स्थितीत २५ % लाभार्थ्याचे आधार जोडणीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित लाभार्थी आधार जोडणीचे काम सुरु आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील धायरी-नांदोशी ते सणस नगर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२१) * १३६३७२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील धायरी-नांदोशी ते सणस नगर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामसडक योजनेतून एकूण ३.१ किमी लांबीच्या सदरहू रस्त्यासाठी उपलब्ध झालेल्या १.९३ कोटी रुपये निधीतून झालेले काम निकृष्ट दर्जाचे झाले असून यामध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोरेगाव (पूर्व) येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीत बिबटया आणि नर सांबराचे मृत शरीर आढळून आल्याबाबत

**(२२) * १३५०४६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व) येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीतील हिंदी मालिकेतील चित्रीकरण स्थळानजीक दिनांक ३ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास एक बिबटया आणि नर सांबराचे मृत शरीर वन विभाग अधिकाऱ्याच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी चित्रनगरीत राबविलेल्या शोध मोहिमे अंतर्गत वन्य प्राण्यांच्या शिकारीसाठी लावण्यात आलेले २८ सापळे वन विभागाने नष्ट केले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची दखल घेऊन चित्रनगरीत घडलेल्या प्रकरणाबाबत चौकशी करण्याचे आदेश मा.मंत्री महोदयांनी वन विभागाच्या सचिवांना दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार चित्रनगरीतील वन्य प्राण्यांच्यी हत्या रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व), दादासाहेब फाळके चित्रनगरी परिसरात सापळ्यामध्ये अडकून एक बिबट्या आणि नर सांबराचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक ३१.१२.२०१८ रोजी निदर्शनास आली आहे.

(२), (३) व (४) उपरोक्त प्रकरणाच्या अनुषंगाने वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी चित्रनगरीत राबवविलेल्या शोधमोहीमे अंतर्गत वन्य प्राण्यांच्या शिकारीसाठी लावण्यात आलेले २८ सापळे निदर्शनास आले असून सदर २८ सापळे नष्ट करण्यात आलेले आहेत.

सदर प्रकरणी आठ आरोपींना अटक करुन त्यांचे विरुध्द वन्यजीव (संरक्षण), अधिनियम, १९७२ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणाची चौकशी पूर्ण करण्यात आली असून, न्यायालयात आरोपीं विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

चित्रनगरीतील वन्य प्राण्यांचे संरक्षणासाठी खालीलप्रामणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- चित्रनगरीतील व आसपासच्या परिसरात दररोज रात्री गस्त केली जाते.
- सुरक्षामंडळाच्या मदतीने मुंबई वनपरिक्षेत्रातील वनपाल/वनरक्षक यांच्या टिमव्दारे चित्रनगरी प्रती १५ दिवसात संपूर्ण चित्रनगरी परिसराची तपासणी केली जाते.
- सदर परिसरात ठिकठिकाणी ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागातील अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे निधी अखर्चित राहील्याबाबत

**(२३) * १३७००५ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागातील अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे अनेक कामे मागील दोन वर्षातही पूर्ण न झाल्याने दोन कोटीचा निधी शासनाकडे परत गेल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून मंजूर झालेली कामे दोन वर्षात पूर्ण करुन निधी खर्च करणे अपेक्षित असताना याकडे अधिका-यांनी दुर्लक्ष केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्यासह हिंगोली जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागातील अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली विभागाकडील सन २०१७-१८ मधील रु ५५५.०० लक्ष अखर्चित निधीपैकी रु ४३४.०४ लक्ष निधी खर्च झाला असुन उर्वरीत रु १२०.९६ लक्ष निधी अखर्चित आहे. कामांची स्थळनिश्चिती, सर्वेक्षण याकरिता लागलेला कालावधी, शेतक-यांची संमतीची अडचण व प्रशासकीय कारणास्तव कामे सुरु होऊ शकली नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदगाव खंडेश्वर ते सातरगांव (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(२४) * १३८९८२ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर ते सातरगांव (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) सात किलो मीटरचे अंतर असून या रस्त्याचे काम टप्प्या टप्प्याने करण्यात आले आहे परंतु मागील वर्षी जो टप्पा करण्यात आला त्या रस्त्याचे काम कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे केल्याचे दिनांक १ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्यासह उक्त रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(३) व (४) नांदगांव खंडेश्वर ते सातरगांव या रस्त्याच्या सा.क्र. ४/०० ते ५/०० या लांबीचे काम जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत माहे मे २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. कामाचा दोषदायित्व कालावधी संपुष्टात आलेला असून सद्यस्थितीत रस्ता वाहतुकी योग्य आहे. रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले नाही.

तथापि, रस्त्यावरील काम पूर्ण होऊन ३ वर्षाचा कालावधी झालेला असल्याने सदर रस्त्यावरील वाहतुकीमुळे किरकोळ खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेला सदर रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील यात्रा स्थळांसह ‘ब’ व ‘क’ दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्र स्थळांच्या विकासासाठी अत्यल्प निधी मंजूर केल्याबाबत

**(२५) * १३५४४७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात ४५० यात्रा स्थळे व वर्ग ‘ब’ व ‘क’ दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्र स्थळाच्या पर्यटनाच्या अनुषंगाने विस्तार व विकास करण्यासाठी तीन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात्रा स्थळे व तीर्थक्षेत्रांना अत्यल्प निधी मंजूर केल्यामुळे उपरोक्त यात्रा स्थळे व तीर्थक्षेत्र तळाचा विकास थांबला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे व त्यानुसार बुलढाणा जिल्हयातील यात्रा स्थळे व वर्ग ‘ब’ व ‘क’ दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी दहा कोटी रुपये मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

बुलढाणा जिल्हयात “ब” व “क” दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्रांची एकूण संख्या ५०४ आहे. त्यापैकी ३५ तीर्थक्षेत्रांना “ब”दर्जा आहे व ४६९ तीर्थक्षेत्रांना “क” दर्जा आहे.

सन २०१८-१९ या वर्षात तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत “क” दर्जा असलेल्या तीर्थक्षेत्रांना रु. ३.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच, याच वर्षात तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत “ब” दर्जा असलेल्या तीर्थक्षेत्रांना रु. ६ कोटी ६७ लक्ष निधीच्या कामांना मंजुरी दिलेली आहे.

(२) व (३) उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, अशी बाब नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत शिक्षकांनी ऑनलाईन बदली प्रणालीमध्ये खोटी माहिती दिल्याबाबत

**(२६) * १४०५३८ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत शिक्षकांनी ऑनलाईन बदली प्रणालीमध्ये अर्ज सादर करताना बनावट व खोटे प्रमाणपत्र जोडल्याने त्यांची मुख्याधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांच्याकडे चौकशी सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार बनावट व खोटे प्रमाणपत्र सादर करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांना चौकशी अधिकारी नेमण्यात आले असून विभागीय चौकशी सुरु आहे. विभागीय चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित शिक्षकांवर उचित कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सर जे.जे.रुग्णालयातील 'मागेल तेथे रक्त' पोहचविणारी योजना बंद असल्याबाबत

**(२७) * १३५२६३ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम**

**(अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालयातील महानगर रक्तपेढीच्या माध्यमातून मुंबईतील रुग्णांना 'मागेल तेथे रक्त' पोहचविणारी 'ब्लड ऑन कॉल' ही आरोग्य विभागाची महत्त्वाकांक्षी योजना मुंबईत बंद करण्यात आली असून सदरहू योजना पुन्हा सुरु करण्याची मागणी सामान्य नागरिक, सामाजिक संघटना यांच्याकडून करण्यात येत असल्याची बाब दिनांक २२ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाने सन २०१३ मध्ये सातारा येथे प्रायोगिक तत्वावर सुरु केलेली ही योजना सन २०१४ पासून मुंबईसह राज्यात कार्यान्वित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जे जे रुग्णालयातील महानगर रक्त पेढीमधून मुबलक रक्त उपलब्ध होणे अपेक्षित असतानाही तेथील बहुंताश उपकरणे बंद आवस्थेत असल्यामुळे सुमारे ४० हजार रक्तपिशव्यांची साठवणूक करण्याची क्षमता असलेल्या रक्त पेढीत महिन्याकाठी केवळ अडीच ते तीन हजार रक्ताच्या पिशव्या रक्तदानातून जमा होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रक्तपेढीतील उपकरणे अद्यावत करून मुंबईतील गरीब व गरजू रुग्णांना जलद गतीने रक्त पुरविणारी 'मागेल तेथे रक्त' (ब्लड ऑन कॉल) ही योजना तात्काळ कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय हे खरे आहे.

मुंबईतील रुग्णालयाकडून रक्ताची अत्यल्प मागणी असल्यामुळे या योजनेतून मुंबई शहरास वगळण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे

(३) हे खरे नाही

सर जे.जे. महानगर रक्तपेढीची रक्तपिशव्या साठवणूक क्षमता १० हजार युनीट एवढी आहे. प्रति माह गरजेप्रमाणे अंदाजे २५०० ते ३००० युनीट एवढे रक्त संकलन होते. सदरच्या रक्ताचे विलगीकरण करुन अंदाजे ९००० रक्त घटक तयार करुन साठवणूक करण्यात येतात.

(४) मुंबईमध्ये रक्ताची मागणी वाढल्यास ही योजना पुन्हा सुरु करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणासाठी जलसंधारण कामांचे स्वतंत्र निकष तयार करणेबाबत

**(२८) * १३६०३५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणची भौगोलिक परिस्थिती पाहता जलसंधारण कामांचे स्वतंत्र निकष तयार करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने स्वतंत्र निकष तयार करण्याचे आदेश मा.जलसंधारण मंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सिमेंट बांधाचे आर्थिक मापदंड वाढविणेचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाने दिनांक १५/११/२०१७ सादर केलेला होता. दरम्यानच्या कालावधीत जलसंपदा विभागाने शासन निर्णय क्र. मापदंड-२०१७/४५२/२०१७/लपा-२, दिनांक १३/७/२०१८ अन्वये कोकण प्रदेशातील योजनांसाठी मापदंड काही अंशी वाढविलेला आहे.

सदर मापदंड मृद व जलसंधारण विभागाच्या कामास वापरण्याबाबत शासन निर्णय क्र.सासिंब-२०१४/प्र.क्र.२०१/जल-७, दिनांक ८/८/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविकांसाठी खरेदी करण्यात आलेल्या मोबाईल फोनच्या खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(२९) * १३६०८९ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी मुख्य सेविका, पर्यवेक्षीका, अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका यांच्यासाठी मोबाईल फोन खरेदी करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अंगणवाडी सेविकांसाठी खरेदी करण्यात आलेल्या १ लाख २० हजार मोबाईल फोनच्या खरेदीत सुमारे ७० कोटीं रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मे. सिस्टेक आयटी सोल्युशन प्रा.लि. या पुरवठादाराकडून "पॅनॉसोनिक ईलुगा आय-सेव्हन" या कंपनीचे मोबाईल फोन खरेदीसाठी १०६,९५,१३,७९५/- रुपये खर्च करण्यात येणार असून या कंपनीच्या मोबाईल फोनचे ऑनलाईन बाजारात मुल्य रुपये ६००० ते ६५०० इतके असताना शासनाने सदर फोन रुपये ८,८७७/- या दराने खरेदी केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जादा दराने मोबाईल फोन खरेदी करणा-या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्र व मिनी अंगणवाडी केंद्र, पर्यवेक्षिका/मुख्यसेविका व जिल्हा व प्रकल्प स्तरावरील तांत्रिक मनुष्यबळ तसेच ५% Buffer Stock असे एकुण १२०३३५ ॲड्राईड मोबाईल फोन खरेदी करण्याची कार्यवाही केंद्र शासनाच्या GeM प्रणालीवरुन करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या GeM प्रणालीमार्फत घोषित झालेल्या L१ निविदाधारक मे. सिस्टेक आयटी सोल्युशन प्रा.लि. यांचेकडून पॅनॉसोनिक या कंपनीचे "पॅनॉसोनिक ईलुगा आय-सेव्हन (Enterprise Edition) चे मॉडेल प्रति नग मोबाईल फोन रुपये ८८७७/- या दराने खरेदी करण्यात आलेले आहेत. या दरामध्ये मोबाईल फोन व माबाईल फोनची बॅटरी यांची २ वर्षाची वारंटी चा समावेश आहे. तसेच इतर Accessories, MDM सॉफ्टवेअरसह घेण्यात आलेले आहेत. तसेच केंद्र शासनाने तयार केलेले सर्व प्रकारचे सॉफ्टवेअर Pre-install करुन देणे या बाबींचा समावेश आहे. त्यामुळे यामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही.

(३) केंद्र शासनाच्या प्रशासकीय मान्यतेनुसार पोषण अभियानांतर्गत ICT Based Real Time Monitoring (ICT-RTM) अंतर्गत प्रत्येक अंगणवाडी केंद्रासाठी ॲन्ड्राईड बेस्ड मोबाईन फोन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

केंद्र शासनाच्या निकषानुसार प्रति मोबाईल फोन रुपये १००००/- एवढी उच्चतम मर्यादा निर्धारित करण्यात आलेली होती. त्यानुसार केंद्र शासनाच्या GeM प्रणालीमार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

केंद्र शासनाच्या GeM प्रणालीवरील निविदा प्रक्रियेनुसार घोषित झालेल्या L१ निविदाधारक मे. सिस्टेक आयटी सोल्युशन प्रा. लि. यांचेकडून पॅनॉसोनिक ईलुगा आय-सेव्हन (Enterprise Edition) या कंपनीचे प्रति नग मोबाईल फोन रुपये ८८७७/- या दराने १२०३३५ मोबाईल फोन खरेदी करण्यात आलेले आहेत. मोबाईल सोबत येणाऱ्या उपकरणा व्यतिरिक्त Mobile Device Management (MDM) Software २ वर्ष परवानासह, SD Card ३२ GB, Dust Proof Pouch, Screen Protector, तसेच मोबाईल फोनची २ वर्ष वारंटी व मोबाईलच्या बॅटरीची देखील २ वर्ष वारंटी इ. बाबींचा समावेश करुन निविदाधारकाने रु ८८७७/- हा दर नमुद केलेला आहे.

ऑनलाईन मिळणारा फक्त मोबाईल फोन व निविदेअंतर्गत प्राप्त झालेला मोबाईल फोन ज्यामध्ये विभागाचे सॉफ्टवेअर स्थापित करणे, दोन वर्ष वॉरंटी व सेवा तसेच अतिरिक्त उपकरणे (३२ GB चे SD कार्ड, स्क्रीन प्रोटेक्टर, डस्ट प्रुफ पाऊच, MDM सॉफ्टवेअर इ.) याबाबींचा समावेश आहे.

(४) व (५) शासनाच्या खरेदी धोरणानुसार व केंद्र शासनाच्या GeM प्रणालीची प्रचलित कार्यपध्दतीनुसार मोबाईल फोन खरेदीची निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आलेली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नसल्याने चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

-----------------

## कसबा वाळवे-चंद्रे बंधारा (जि.कोल्हापूर) पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३०) * १३६३५९ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसबा वाळवे-चंद्रे बंधारा (जि.कोल्हापूर) या पुलाची दुरवस्था झाल्याने पुलावरुन होत असलेली वाहतुक माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान बंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर पुलाची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय हे खरे आहे

कसबा वाळवे-चंद्रे बंधारा हा पूल नसून दुधगंगा नदीवरील कसबा वाळवे व चंद्रे या गावांदरम्यान बांधण्यात आलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा आहे. सदर को.प.बंधाऱ्यावरून वाहतूक करणे अपेक्षित नाही. सदर बंधाऱ्याचा स्तंभ क्र.२०, दिनांक ०७/०२/२०१९ रोजी ढासळल्याने बंधाऱ्यावरून होत असलेली वाहतूक त्या दिवसापासून तातडीने बंद करण्यात आली होती.

(२) होय.

कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (उत्तर), कोल्हापूर यांनी दि.०७/०२/२०१९ रोजी सदर बंधाऱ्याची पाहणी केली आहे.

(३) बंधाऱ्याच्या स्तंभ दुरूस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद अंतर्गत धोकादायक शाळांची पुर्नबांधणी करणेबाबत

**(३१) * १४०००३ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या सुमारे ५२८ वर्ग खोल्या धोकादायक असून त्या शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आल्याचे दिनांक ३ एप्रिल,२०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर धोकादायक वर्ग खोल्या पाडण्यास जिल्हा परिषदेने मंजूरी दिली असून संबंधित तालुकास्तरावरून याबाबत विलंब होत आहे तसेच पंढरपूर तालुक्यातील २२ शाळा व ७१ इमारती तसेच मंगळवेढा तालुक्यातील १७ शाळा व ४८ इमारती धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शाळांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार उपरोक्त धोकादायक शाळांची पुर्नबांधणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) पंढरपूर तालुक्यातील ३९ शाळांच्या १२७ वर्ग खोल्यांची व मंगळवेढा तालुक्यातील १९ शाळांच्या ५६ वर्ग खोल्यांची तपासणी करण्यात आली असून अनुक्रमे ३४ शाळांच्या ९६ वर्ग खोल्या व १७ शाळांच्या ४७ वर्ग खोल्या धोकादायक आहेत.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्ती व शाळांच्या वर्ग खोल्या बांधकामासाठी सर्व शिक्षा अभियान/जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षासाठी तरतुद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वैदयकीय महाविदयालयातील निवासी डॉक्टरांना विद्यावेतन नियमित मिळत नसल्याबाबत

**(३२) * १३५७१३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही वैदयकीय महाविदयालयांतील निवासी डॉक्टरांनी त्यांच्या प्रलंबित विद्यावेतनाच्या मागणीसाठी कामबंद आंदोलनाचा इशारा शासनाला माहे मार्च, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवासी डॉक्टरांना त्यांचे थकीत विद्यावेतन मिळण्यासाठी मध्यवर्ती मार्ड संघटनेने दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आंदोलनामुळे अकोला महाविदयालयाचा एक महिन्याचा तर अंबेजोगाई व लातूर येथील महाविदयालयाचा प्रत्येक दोन महिन्यांचे विद्यावेतन खुले करण्यात आले असल्याची माहिती दिनांक १६ एप्रिल, २०१९ वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्व निवासी डॉक्टरांना नियमीत विद्यवेतन मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) अंशतः खरे आहे.

(४) राज्यातील सर्व निवासी डॉक्टरांना नियमित विद्यावेतन मिळावे याकरिता आवश्यक अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महिला व बालविकास विभागामार्फत नियमबाहयरित्या शालेय पोषण आहाराचे कंत्राट दिल्याबाबत

**(३३) * १३४८७९ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे**

**(जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महिला व बालविकास विभागाने ६,३०० कोटी रुपयांचे शालेय पोषण आहाराचे कंत्राट प्रचलित नियमांकडे दुर्लक्ष करुन दिल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोषण आहाराच्या निविदा रदद करण्याचे आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ९ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास राज्य शासनास दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची चौकशी सी.बी.आय. मार्फत करण्याबाबतची मागणी काही सामाजिक संस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नियमबाहयरित्या शालेय पोषण आहाराचे कंत्राट देणा-या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत अंगणवाडयामध्ये ६ महिने ते ३ वर्षाची बालके व गरोदर स्तनदा माता यांना Take Home Ration (THR) देण्यासाठी ८ मार्च,२०१६ रोजी निविदा प्रकाशित करण्यात आली होती. सदर निविदे संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल करण्यात आली होती. सदर SLP बाबत दिनांक १९ एप्रिल,२०१७ रोजी न्यायालयाने अंतिम आदेश पारित केले होते. सदर अंतिम आदेशानुसार ८ मार्च,२०१६ च्या निविदेनुसार १८ महिला संस्थांना THR पुरवठयाचे काम मंजूर केले होते. सदर निविदा पुर्णपणे केंद्र शासनाच्या गाईड लाईन व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या यापूर्वीच्या आदेशांच्या अधिन राहून काढण्यात आली होती. सदर निविदेची वार्षिक किंमत साधारणत: ७०० कोटी रुपये इतकी होती.

(२) होय.

(३) होय.

(४) शासनाच्या दिनांक २६ मार्च, २०१९ च्या पत्रानुसार लाभार्थ्यांना गरम ताजा आहार व टी.एच.आर. पुरवण्याकरीता राबवावयाच्या ईनिविदा प्रक्रियेकरीता तसेच निविदेवर अंतिम निर्णय घेण्याकरीता उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६.२.२०१९ च्या आदेशाबाबत अधिक स्पष्टता होण्यासाठी दिनांक २५.४.२०१९ ला Review Petition दाखल करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील श्रीगाव धरणाच्या पाण्यापासून शेतकरी वंचित राहिल्याबाबत

**(३४) * १३८००१ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी श्रीगाव येथे सन १९८५ मध्ये धरण बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणातील पाणी परिसरातील गावांना पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणी मिळावे म्हणून कालवे व पाईपलाईनही टाकण्यात आलेली असतानाही गेल्या २६ वर्षात पाटबंधारे विभागाच्या दुर्लक्षितेमुळे शेतकरी पाण्यापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार श्रीगाव धरणाच्या परिसरात असलेल्या गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी पुरवठा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

श्रीगांव लघुपाटबंधारे प्रकल्प सन १९८८ मध्ये बांधण्यात आला आहे.

(२) नाही.

श्रीगांव लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या माध्यमातून परिसरातील एकूण ५ ग्रामपंचायतींना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येते तसेच श्रीगांव व पोयनाड या गावातील शेतीला पाण्याचा लाभ होत आहे.

श्रीगांव लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या लाभधारक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार पाणी उपलब्ध करुन देण्यात येते. सन २०१८-१९ हंगामामध्ये प्रकल्पामध्ये पूर्ण क्षमतेने साठा झालेला नसल्याने शेतीसाठी पाणी सोडण्यात येवू नये म्हणून श्रीगांव ग्रामपंचायतीने पत्राद्वारे कळविले होते. त्यामुळे सन २०१८-१९ या हंगामामध्ये सिंचनास पाणी सोडण्यात आलेले नाही.

(३) या प्रकल्पावरील संबंधित गावांना पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) येथील नाणेघाटाचे सुशोभिकरण करण्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३५) * १३८२९८ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) येथील ऐतिहासिक नाणेघाटाच्या सुशोभिकरणाचे काम आयुष कन्स्ट्रक्शन, निलांजन एण्टरप्रायझेस, दत्त कन्स्ट्रक्शच्या कंत्राटदरांनी वनक्षेत्रापालाच्या संगनमताने निकृष्ट दर्जाची केले असून त्याचबरोबर काही ठिकाणी काहीच कामे न करता देयके मंजूर केली असल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीसाठी स्थापन केलेल्या समितीने सदर कामात गैरव्यवहार झाल्याचे मान्य करून तसा अहवाल सादर केला असल्याची बाब दिनांक २६ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास अली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाणेघाटाच्या सुशोभिकरणासाठी २६ कि.मी. दुरुन दगड आणण्याचे अंदाजपत्रक असूनही कोणताही दगड न आणता प्रशासन व ठेकेदार यांच्या परस्पर संगनमताने ७५ लाखा रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार या प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाणेघाट पुरातन मार्गाचे दुरुस्तीचे काम ई-निविदा प्रणालीद्वारे आयुष कन्स्ट्रक्शन, निलांजन एण्टरप्रायजेस, दत्ता कन्स्ट्रक्शन या ठेकेदारांना देण्यात आले होते. त्यांचेकडून कामे करुन घेवून मोजमापे, मोजमाप नोंदवहीत नोंदवून कामाची रक्कम संयुक्त वन व्यवस्थापन समिती, पेंढरी यांचेमार्फत अदा करण्यांत आली आहेत. सदर तक्रारीचे अनुषंगाने चौकशीकरीता स्थापन समितीने सदर कामाची तपासणी करुन मोजमाप पुस्तिकेतील काही नोंदी व प्रत्यक्ष मोजमापे याबाबत भिन्नता आहे. भिंतीसाठी तसेच पायऱ्यांच्या बांधकामाकरीता घडीव दगडा ऐवजी उपलब्ध नैसर्गिक अवस्थेतील दगडांचा वापर केला आहे. मोजमाप पुस्तकेनुसार पायऱ्या व भिंतीसाठी खोदकाम केल्याची नोंद आहे. प्रत्यक्ष जागेवर खोदकाम करण्यात आलेले नाही. असे चौकशी अहवालात नमूद केलेले आहे.
(२), (३) व (४) चौकशी समितीने चौकशी अहवालात नमूद केल्यानुसार सदर कामाची सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तपासणी होणे आवश्यक

वाटल्याने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ ठाणे यांना याप्रकरणी सविस्तर चौकशी करुन अहवाल पाठविणेस कळविले आहे. अहवाल अद्याप प्रलंबित आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी संबंधित ठेकेदार यांचे स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. त्या स्पष्टीकरणाच्या आधारे संबंधित ठेकेदार यांची नावे काळया यादीत टाकणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांना कळविण्यात आले आहे. तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेकडील अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सैनिक टाकळी (जि.कोल्हापूर) येथील कृष्णा नदीवर मिनी बंधारा बांधण्याबाबत

**(३६) * १३७७५९ श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील राजापूर बंधा-यापासून पुढील गावात वारंवार पाणी टंचाई निर्माण होत असल्याने सैनिक टाकळी, दानवाड, राजापूरवाडी, खिद्रापूर या गावातील पाणी टंचाई दूर करण्याकरिता सैनिक टाकळी गावात कृष्णा नदीवर मिनी बंधारा बांधण्याची मागणी नागरिकांनी शासनाकडे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सैनिक टाकळी गावात कृष्णा नदीवर मिनी बंधारा बांधण्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही. सैनिक टाकळी जि.कोल्हापूर या गावालगत कृष्णा नदीवर मिनी बंधारा बांधणेबाबत कोणतीही मागणी प्राप्त झालेली नाही.

कृष्णा नदीवरील राजापूर को.प. बंधाऱ्यामध्ये पाणी अडवून उपसा सिंचनाद्वारे कृष्णा नदीचे दोन्ही तीरावरील सरासरी १२२५० हेक्टर क्षेत्र सिंचित केले जाते. तसेच नदीकाठावरील दोन्ही तीरावरील २३ ग्रामपंचायती, २ नगरपालिका व १ साखर कारखान्याकरिता पिण्यासाठी व औद्योगिक कारणासाठी कोयना / वारणा धरणातून आवश्यकतेनुसार पाणी सोडून पुरविले जाते.

को.प. बंधारा राजापूरचे खालील बाजूस असणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील सैनिक टाकळी, दानवाड, राजापूरवाडी व खिद्रापूर या गावांसाठी सिंचन व बिगर सिंचनासाठी आवश्यकतेनुसार राजापूर को.प. बंधाऱ्यातून पाणी सोडून पुरविले जाते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे भरतगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथील हाकेवाडी तलाव भरण्यासाठी पाईपलाईन करण्याकरिता निधी मिळण्याबाबत

**(३७) * १४०९२९ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भरतगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथील हाकेवाडी तलावात पुरंदर उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडण्याबाबतची मागणी ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास अधीक्षक अभियंता, पुरंदर उपसा सिंचन योजना यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या कुपटेवाडी वितरीकेवरून मौजे भरतगाव येथील हाकेवाडी तलाव भरण्यासाठी पाईपलाईन करण्याकरिता निधी मिळण्याची आवश्यकता असून त्यासाठीचे अंदाजपत्रक देखील सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेसाठी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

मौजे भरतगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथील हाकेवाडी तलावात पुरंदर उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडणेबाबत ग्रामस्थांनी व मा.आमदार, दौंड यांनी दिनांक १८/१२/२०१८ व दि.७/१/२०१९ चे पत्रान्वये मंडळ कार्यालयाकडे मागणी केलेली आहे.

(२) नाही.

(३) हाकेवाडी तलाव पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या लाभ क्षेत्राबाहेरील आहे. नियोजित सिंचन क्षेत्रामध्ये आता बदल करणे शक्य नसल्यामुळे तसेच योजनेची कामे पूर्णत्वास असल्याने आणि योजनेच्या पाणी वापर ४.०० टीएमसीचे नियोजन पूर्ण झालेले असल्याने या व्यतिरिक्त आणखी वाढीव लाभक्षेत्रात पाणी देण्यासाठी पाणी उपलब्ध नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रभावी आराखडा तयार करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३८) * १३४८७३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.योगेश**

**(बापू) घोलप (देवळाली), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी सर्व यंत्रणांना एकत्रित आणून प्रभावी आराखडा तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाट व पालघर तालुक्यात कुपोषणामुळे ८० हजार बालके आणि गभर्वती महिलांचा व कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील २ बालकांचा मृत्यू झाल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) तसेच सांगली जिल्हयातील ग्रामीण भागात ६५४ बालके कुपोषित असून नाशिक जिल्हयात २७३० बालके कुपोषित असून ठाणे जिल्हयातील ग्रामीण भागात, आदिवासी व दुर्गम भागात सुमारे १५४८ बालके कमी वजनाची असून

कंधार (जि.नांदेड) येथे १९३ बालके कमी वजनाची असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कुपोषणाने होणारे मृत्यू रोखण्यासाठी न्युमोकॉकल या लसीकरीता केंद्राकडून निधी उपलब्ध होत नाही तसेच कुपोषण बालकांना पाकीटबंद आहार देण्यापेक्षा ताजा आहार देण्यात यावा अशी मागणी विविध स्तरावरुन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात कुपोषणामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत व कुपोषणग्रस्त बालकांवर व गर्भवती महिला व स्तनदा माता यांच्यावर योग्य ते उपचार करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेलया विविध बैठका तसेच मा.उच्च न्यायालयात बालमृत्यू व कुपोषणाबाबत दाखल असलेल्या याचिकेत प्राप्त निर्देशानूसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये टास्क फोर्सची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) नाही.

अमरावती जिल्हयातील मेळघाट भागात सन २०१८-१९ मध्ये विविध कारणांनी ३०९ बालकांचा व ६ गर्भवती मातांचा मृत्यू झालेला आहे.

पालघर जिल्हयात सन २०१८-१९ मध्ये विविध कारणांनी ३४८ बालकांचा व ५ गर्भवती मातांचा मृत्यू झालेला आहे.

कर्जत (जि.रायगड) प्रकल्पामध्ये माहे मार्च २०१९ मध्ये वा त्यादरम्यान कुपोषणामुळे एकही बालमृत्यू झालेला नाही.

(३) हे खरे आहे.

(४) केंद्र शासनाकडून सर्व राज्यांना टप्या टप्याने न्युमोकॉकल लस देण्यात येणार आहे. राज्यातील आदिवासी भागांमध्ये ही लस उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच कुपोषित बालकांना पाकीटबंद आहार देण्यापेक्षा ताजा आहार देण्यात यावा अशी कोणतीही मागणी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(५) राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्याचा कृती आराखडा (Action Plan) तयार करण्याची बाब विचाराधीन होती.

त्यानुषंगाने राज्यातील आदिवासी तसेच बिगर आदिवासी क्षेत्रात कुपोषणाला आळा घालण्यासाठी सर्व यंत्रणांना एकत्रित आणून ग्राम बाल विकास केंद्र योजना सुरु करण्यात आलेली आहे. कुपोषणामुळे बालमृत्यू होत नसून आरोग्यविषयक व अन्य विविध कारणांमुळे होतात.

त्याचप्रमाणे राज्यातील कुपोषण व बालमृत्यू ला प्रभावीपणे आळा घालण्यासाठी सेवा देणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये समन्वय आणण्याच्या दृष्टीने AAA (ANM/AWW/ASHA) ही कार्यप्रणाली विकसीत करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ७.१२.२०१७ रोजी निर्गमीत करण्यात आलेला आहे.

याशिवाय राज्यातील कुपोषणाला व बालमृत्यूला आळा घालण्याकरीता संपूर्ण राज्यभरात एकात्मिक बाल विकास योजनेत पोषण अभियानांतर्गत महिला व बाल विकास विभागासह इतर ०७ विभागांच्या सहकार्याने व सक्रिय सहभागातून वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात येवून एकात्मिक बाल विकास योजनेचे बळकटिकरण करण्यात येत आहे.

राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कुपोषण व बालमृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत-

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) तसेच आदिवासी प्रकल्पांमध्ये अमृत आहार योजना सुरु असून हया योजने अंतर्गत गरोदर स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो.

३) तसेच अमृत आहार योजनेअंतर्गत ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी व शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडी देण्यात येतात.

४) अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर, स्तनदा माता यांच्यासाठी प्रति लाभार्थी एक वेळच्या चौरस आहारासाठी रु.३५ व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना अंडी/केळी यासाठीचा प्रति लाभार्थी नियमित आहाराव्यतिरिक्त रु.६ इतका खर्च करण्यात येतो.

५) राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आले असून या ठिकाणी तीन वेळचा अतिरिक्त आहार देण्यात येतो. तसेच, आरोग्य विभागामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

६) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षणवृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रियलटाईम मॉनिटरिंग (LCT-RTM) व जनआंदोलन इत्यादि कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत माता मृत्यु व बाल मृत्यु रोखण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात - गरोदरपणातील संपूर्ण तपासणी व उपचार, संस्थात्मक प्रसूती, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, नियमीत लसीकरण, नवजात स्थिरीकरण कक्ष, विशेष नवजात काळजी कक्ष, बाल मृत्यू अन्वेषण, एचबीएनसी व इन्टेनसिफाईड एचबीएनसी, जीवनसत्व “अ” व जंतनाशक मोहिम, बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत तज्ञांमार्फत मातांची व बालकांची तपासणी व उपचार, नवसंजीवनी कार्यक्रमा अंतर्गत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकामार्फत आरोग्य तपासणी व उपचार, दायी बैठक योजना इत्यादी.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुळजापूर (जि.उस्मानाबाद) तालुक्यात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत झालेला गैरव्यवहार

**(३९) * १३९८४८ श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील १७ गावांमधील पाणलोट समितीकडे जमा झालेला ५ कोटी ५६ लाख रुपयांच्या निधीचा अपहार झाल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत प्राप्त झालेला निधीचा विनियोग करण्यासाठी पाणलोट समितीला न विचारताच बनावट सचिव, कंत्राटदार व बनावट कामे दर्शवून निधीचा अपहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रकल्प व्यवस्थापन तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना विभागीय कृषी सहसंचालक यांना दिल्या असतानाही याप्रकरणी संबंधितांवर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१) हे खरे नाही. तथापि, श्री.अप्पा बापू रवळे, मु.पो.धोत्री, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांच्या दि. २८/०२/२०१९ रोजीच्या तक्रार अर्जान्वये धोत्री ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथील पाणलोट समितीमधील रु.४० लाख रक्कमेचा अपहार झाल्याची तक्रार प्राप्त झाली आहे.

(२), (३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या दि.१२/१२/२०१८ चे अहवालानुसार ग्रामपंचायत धोत्री, ता.तुळजापूर येथील दिनांक ०४/१२/२०१२ ची ग्रामसभा ही नियमबाहय झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यासंदर्भात तातडीने चौकशी पूर्ण करण्याचे व अभिलेख प्राप्त न झाल्यास पोलीस कारवाई करण्याचे निर्देश अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा

अधिक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद यांना दि.०९/४/२०१९ च्या पत्रान्वये दिले असून त्याची प्रत विभागीय कृषी सहसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील दांडगुरी ते बोर्लीपंचतन या रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत

**(४०) * १३६३२० श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील दांडगुरी ते बोर्लीपंचतन या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामास सुरुवात होऊन तीन महिन्यांचा कालावधी झालेला असताना अद्यापही या रस्त्यांची दुरुस्ती न झाल्यामुळे या रस्त्याची दुरावस्था झाली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशतः खरे आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील चिखलप दांडगुरी रस्ता प्रजिमा ५७ चा भाग आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी १०.८०० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्याच्या कामातील एमपीएमचे काम माहे फेब्रुवारी व मार्च दरम्यान प्रगतीपथावर होते.

प्रश्नांकित रस्त्याचे काम मे २०१९ अखेर सर्वदृष्टया पूर्ण झालेले आहे.

(२) अंदाजपत्रकातील लांबीपैकी ४०० मीटर लांबीतील काम होणे बाकी आहे. तथापि निधीच्या उपलब्धतेनुसार रस्त्याचे काम लवकरात लवकर हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील बोगस डॉक्टर व अनधिकृत डेंटल लॅबवर कारवाई करणेबाबत

**(४१) * १३८२८० श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात ११०० बोगस डॉक्टर वैद्यकिय सेवा करीत असल्याचे तसेच शहरात केलेल्या तपासणी मोहिमेतंर्गत २५ पेक्षा जास्त अनधिकृत डेंटल लॅब कार्यरत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पात्रता नसलेल्या व्यक्तींनी अनधिकृत डेंटल लॅब सुरु केले असल्याने हा अवैध व्यवसाय रोखण्याचे आव्हान डेंटल कौन्सिलपुढे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार नाशिक शहरात वैद्यकिय सेवा करीत असलेले बोगस डॉक्टर तसेच अनधिकृत डेटल लॅब चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही, तथापि याबाबत महाराष्ट्र राज्य दंत परिषदेला प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करण्याच्या सूचना परिषदेने संबंधित शोध समितीला दिल्या आहेत.

(२) याबाबत परिषदेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) शासनाच्या दि. २२.०१.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनधिकृत /बोगस दंतवैद्य/दंत आरोग्य रक्षक/दंतकारागीर यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कार्यवाही करण्यासाठी जिल्हा स्तरीय /तालुकास्तरीय समितीच्या अधिकारात वाढ करुन त्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

(४) याबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना परिषदेने संबंधित समितीला दिले आहेत. चौकशी पूर्ण झाल्यावर त्यानुषंगाने समितीकडून कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भांबुर्डा वन विहार (जि.पुणे) येथे चंदनचोरी होत असल्याबाबत

**(४२) * १४११०४ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे वन विभागाच्या कार्यालयापासून जवळच असलेल्या भांबुर्डा वन विहार येथे चंदनचोरी झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेताळ टेकडी अंतर्गत येणाऱ्या वनक्षेत्रात चंदनाची झाडे इलेक्ट्रॉनिक कटिंग मशीनने तोडल्याचे सर्पमित्रांना आढळून आले असून या संदर्भात वनाधिकारी कार्यालयात कळवूनही त्याची दखल घेतली जात नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन अधिकाऱ्यांकडे असलेल्या नोंदीनुसार वेताळ टेकडी परिसरात माहे जुलै २०१७, मध्ये ४ व माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये ९ व माहे एप्रिल, २०१८ मध्ये २ झाडे तोडली असुन वेताळ टेकडी परिसरात दोनशे चंदनाची झाडे असल्याचे वन कर्मचाऱ्यांचे म्हणणे असून या वनक्षेत्राच्या संरक्षणासाठीच्या भितींचे काम थांबविल्याने अशा चोऱ्या होत असल्याचे वन परिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून सांगण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने संबधित दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) भांबुर्डा वन विहारात चंदन चोरीची घटना निदर्शनास आलेली नाही. तथापि, वेताळ टेकडी परिसरात माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये चंदनाची एकूण ४ बुडे बुडवेढी ३० सेमी ते ५३ सेमीची चोरतुट झाल्याचे निदर्शनास आल्यावरुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जागेवरील मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असून सदर प्रकरणी आरोपी आढळून आलेला नसल्यामुळे पुढील तपास चालू आहे.

भांबुर्डा वनपरिक्षेत्रातील स.न.९६ वेताळ टेकडीवर सिमाभिंत बांधणेचे काम ईनिविदान्वये सुरु करण्यात आले होते. परंतू वेताळ टेकडी येणारे नियमित नागरीक व स्थानिक प्रतिनिधी यांचे विरोधामुळे काम पूर्ण होवू शकले नाही. निविदाधारकास सदर कामाकरिता मुदतवाढ देण्यात आली.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैद्‌यकीय विषयातील पदव्युत्तर पदविका उत्तीर्ण असल्याचे बोगस प्रमाणपत्रे सादर केलेल्या डॉक्टरांवर कारवाई करणेबाबत

**(४३) * १३५३५२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ५७ डॉक्टरांनी एमबीबीएस नंतर बालरोग, स्त्री रोग आदि पदव्युत्तर पदवी परिक्षा पास झाल्याची बोगस प्रमाणपत्रे महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिल (एमएमएस) कडे सादर केल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व डॉक्टर मुंबईच्या कॉलेज ऑफ फिजिशियन्स ऑफ सर्जन्स (सीपीएस) या वैद्यकीय महाविद्यालयातील सन २०१४-१५ या वर्षीच्या बॅचचे असून पदविका उत्तीर्ण असल्याची बोगस कागदपत्रे तयार करून बेकायदेशीर नोंदणी करणाऱ्या एकूण ५७ जणांविरोधात महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने आग्रीपाडा पोलीस ठाणे येथे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय.

(३) असल्यास, सबंधित महाविद्यालयाच्या विधीतज्ञांनी सहमती दर्शवूनही महाविद्यालयाच्या संचालक मंडळाने सह तक्रारदार होण्यास टाळाटाळ केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार याप्रकरणी शासनाने संबंधित दोषी डॉक्टरांवर कारवाई करण्यासह वैद्यकीय क्षेत्रातील अशा गैरप्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) सदर संस्थेच्या २०१३-१४ च्या बॅचचे २३ व २०१४-१५ चे ३४ वैद्यकीय व्यवसायीकां विरुध्द दि. १९.१०.२०१८ रोजी आग्रीपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. २५३/२०१८ दाखल करण्यात आले आहे.

(३) नाही हे खरे नाही.

(४) शासनाने दि. ०५.०९.२०१८ च्या पत्रान्वये याबाबत चौकशी करण्याच्या सूचना महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला दिल्या आहेत.

(५) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने दोषी डॉक्टरांचा व्यवसाय परवाना रद्द केला असून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच अशा गैरप्रकारांना आळा घालण्याकरिता महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेद्वारा महाविद्यालयाची तथा विद्यापीठांची प्रमाणपत्रे पडताळणी करिता संबंधितांकडे पाठविण्यात येतात व पडताळणी पूर्ण झाल्यानंतर नोंदणी करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील पांगरी शिवारात सुरु असलेल्या पाच बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(४४) * १३५४०३ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील तामसा येथून जवळच असलेल्या पांगरी शिवारात लघु पाटंधारे विभागातंर्गत असलेल्या पाच बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची सुरु असलेली कामे अंत्यत निकृष्ट दर्जाचे होत असुनही संबंधित अभियंत्याने त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हदगाव येथील लघु पाटबंधारे विभागातंर्गत तामसा भागातील पांगरी शिवारात जुन्या पाच सिमेंट बंधा-यांच्या दुरुस्तीचे काम सुरु असुन मोडकळीस आलेल्या बंधा-यांची दुरुस्ती, गाळ काढणे, नाला सरळीकरण करणे इत्यादी कामे सुरु आहेत परंतु या कामाकडे संबंधित अभियंता दुर्लक्ष करीत असल्याने कंत्राटदारा कडून उक्त कामे निकृष्ट दर्जाची करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार बंधाऱ्याची कामे निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदार व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अभियंत्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोर (जि.पुणे) तालुक्यातील कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यांची दुरुस्ती करणेबाबत

**(४५) * १३७२३२ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यांची कामे पूर्ण होऊन यातील पाणीसाठा शेतीसाठी उपयोगात आणला जात होता परंतु सदरचे बंधा-यांना मागील अनेक वर्षापासून गळती लागल्याने हे बंधारे पूर्ण क्षमतेने पाण्याने भरत नसल्याने त्यांची त्वरीत दुरुस्ती होणे आवश्यक असतांनाही संबंधित विभाग दुरुस्ती करीत नसल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोर तालुक्यातील १५ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे गळतीयुक्त असून ४ बंधा-यांचे अंदाजपत्रक मंजूरीसाठी प्रलंबित असल्यामुळे नागरिकांची पाण्याअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अंदाजपत्रकास मंजूरी देण्यासह या तालुक्यातील कोल्हापूर पध्दतीचे बंधाऱ्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

भोर (जि.पुणे) तालुक्यामध्ये नीरा नदीवर ८ व गुंजवणी नदीवर ७ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत. त्यापैकी निरा नदीवरील ४ व गुंजवणी नदीवरील ३ को.प.बंधारे हे ३० ते ३५ वर्षापूर्वीचे असल्यामुळे स्तंभ तळातील फरशीस मोठ्या प्रमाणावर क्षती पोचल्यामुळे बंधाऱ्यातून गळती होते.

(२) व (३) नीरा नदीवरील बंधाऱ्यांमध्ये नीरा देवधर प्रकल्पाचे पाणी व गुंजवणी नदीवरील बंधाऱ्यांमध्ये गुंजवणी प्रकल्पाचे पाणी वर्षभर उपलब्ध होत असल्यामुळे नागरीकांची व शेतकऱ्यांची गैरसोय होत नाही.

तसेच शासन निर्णय दि.२७/११/२०१८ नुसार विस्तार व सुधारणा अंतर्गत करावयाच्या कामांसाठी महामंडळाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीची मर्यादा २% वरून १०% पर्यंत वाढविलेली आहे. या शासन निर्णयातील निर्देशानुसार विशेष दुरूस्ती कामांसाठी कामनिहाय खर्चाचा प्राधान्यक्रम महामंडळाच्या नियामक मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.९९/५ अन्वये मान्यता दिली आहे. त्यामध्ये सदर कामांचा समावेश असून अंदाजपत्रके शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुणकेश्वर (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) या पर्यटन स्थळास सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४६) * १३५४३६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुणकेश्वर (ता.देवगड, जि.सिंधूदूर्ग) या पर्यटनस्थळास श्री देव कुणकेश्वर मंदिर ट्रस्टने केलेल्या मागिल अनेक वर्षाच्या मागणीनुसार शासनाने पर्यटनस्थळाचा दर्जा मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुणकेश्वर या तीर्थस्थळास शासनाने ‘ब’ वर्ग पर्यटनस्थळ म्हणून मंजूरी दिल्यानंतर अद्यापपर्यंत ‘ब’ वर्ग पर्यटनस्थळासाठी असलेल्या सोयीसुविधा पुरविण्याबाबत दिरंगाई होत असल्याने पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु पर्यटन स्थळासाठी शासनाने दिनांक २५ एप्रिल, १९९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली योजना कुणकेश्वर पर्यटन केंद्रासाठी मंजूर झालेली आहे मात्र त्या करिता पर्यटन विभागाकडून आवश्यक तो निधी प्राप्त न झाल्याने त्या योजनेच्या निविदा काढण्यात आलेल्या नाहीत तसेच एक कोटी रुपयाची पाणीपुरवठा योजना मंजूर केलेली असतानाही अद्यापपर्यंत सदरहु पाणीपुरवठा योजनेच्या कामास सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कुणकेश्वर या 'ब' वर्ग पर्यटनस्थळासाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) श्री क्षेत्र कुणकेश्वर, ता. देवगड, जि सिंधुदुर्ग या ठिकाणास ग्राम विकास विभागाच्या दि.१४/२/२०१९ च्या शासन निर्णयाव्दारे तिर्थस्थळाचा 'ब' वर्ग दर्जा देण्यात आलेला आहे.
(२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत केंद्रीय पर्यटन मंत्रालयामार्फत PIDCC योजना व १२ व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध निधीमधून कुणकेश्वर, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ५.५ हेक्टर जागेवर पर्यटक संकुल उभारण्यात आले असून तेथे पर्यटकांसाठी विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
(३), (४) व (५) सदर पर्यटन स्थळासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतंर्गत दिनांक १८.२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये विहित कामासाठी रुपये १५८.०७ लक्ष निधीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यापैकी रुपये २५.०० लक्ष्न निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

-----------------

## चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील केद्राई धरणातील पाण्याचा अवैधरित्या उपसा होत असल्याबाबत

**(४७) * १३७४२१ डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील नाशिक पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील केद्राई धरणातील पाण्याचा अवैधरित्या उपसा केल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळी परिस्थितीत पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने पाणीसाठा बचतीचे सक्त आदेश दिले असताना संबंधित विभागाचे अभियंता, कर्मचारी व महसूल विभागाने याकडे दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पाण्याचा अवैधरित्या उपसा करणा-यांवर कारवाई करण्यासह टंचाईमध्ये पाण्याचे नियोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

याबाबत दुर्लक्ष करण्यात आलेले नाही.

पाणी बचतीबाबत महसूल विभाग, पाटबंधारे विभाग व ग्रामपंचायतीचे कर्मचारी यांनी संयुक्त कार्यवाही करुन पाणी उपसा करण्याचे साहित्य ग्रामपंचायतीकडे जमा करण्यात आले आहे.

(३) वरीलप्रमाणे कारवाई करणेत आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## गांध्रे (ता.वाडा, जि.पालघर) गावातील गांध्रे-ठाकरेपाडा रस्त्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(४८) * १३९३३५ श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गांध्रे (ता.वाडा, जि.पालघर) गावातील गांध्रे-ठाकरेपाडा रस्त्याचे काम करण्यासाठी सुमारे १९ लाख ३१ हजार रकमेची बनावट देयके काढून गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची स्थानिक ग्रामस्थांनी पालघर जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करुन चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२) व (३) ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०१२-१३ व २०१४-१५ मध्ये मौजे-गांध्रे (ता.वाडा, जि.पालघर) गावातील गांध्रे- ठाकरेपाडा रस्त्याचे डांबरीकरण व कॉंक्रिटीकरण न करता देयके (रु. १९,३१,६७६/-) अदा करुन अपहार केल्याची बाब आय. आय.टी. मुंबई यांच्या अहवालातील पृ. क्र. १९१, १९२ व १९३ नुसार निष्पन्न होत असल्याची तक्रार श्री.शरद यशवंत पाटील यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे करुन चौकशीची मागणी केली होती. त्यानुसार सदर प्रकरणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी, विकास, प्रकल्प, जव्हार यांनी तहसिलदार वाडा यांचे पथक नेमून चौकशी केली आहे. सदर चौकशीत गांध्रे-ठाकरेपाडा रस्त्याचे काम झालेले नसल्याचे त्यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

तथापि उपरोक्त तक्रार आय.आय.टी., मुंबई यांनी गांध्रे गावात केलेल्या तपासणीचे अनुषंगाने आहे. तद्नुषंगाने नमूद करण्यात येते, की जिल्हाधिकारी, पालघर यांनी त्यांच्या दि. २२/३/२०१६ च्या आदेशान्वये जव्हार प्रकल्पांतर्गत सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या कालावधीत झालेल्या कामांचे आय.आय.टी., मुंबई यांच्या मार्फत सामाजिक अंकेक्षण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार गांध्रे गावातील ठाकरेपाडा येथे दि. ३१/०५/२०१८ रोजी केलेल्या तपासणीत सिमेंट रस्ता (रु. ९,९९,६५४/-) व डांबरी रस्ता (रु.९,३२,०२२/-) ही कामे झाली नसल्याचे दि. ९ जुलै, २०१८ रोजी सादर केलेल्या अहवालात नमुद केले आहे. मात्र प्रकल्प कार्यालयातील दस्तऐवजांची पडताळणी केली असता सदर कामे ठाकरे पाडा येथे मंजूर नसून ठाणगेपाडा येथे मंजूर असल्याचे दिसून आले. यास्तव आय. आय. टी. ने गांध्रे गावातील कामांचे संबंधित यंत्रणेच्या अधिका-यांच्या उपस्थितीत

दि.३०/१/२०१९ रोजी पुन:तपासणी केली तेव्हा सदर दोन्हीही कामे ठाणगे पाडा येथे आढळून आलेली आहेत. सदर कामे मंजूर ठिकाणी ठाणगेपाडा येथे प्रत्यक्षात जागेवर आढळून आलेली असल्याने प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा व्याघ्र प्रकल्पात वाघांचे झालेले मृत्यू

**(४९) * १३५२१९ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरात सशस्त्र सुरक्षा असतानाही शिका-याने लावलेल्या सापळयामध्ये अडकून एक दिड वर्षाच्या वाघिणीचा मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक १३ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ताडोबाच्या अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमधील भामढेळी गावातील शेतात विद्‌युत तारांचा स्पर्श झाल्याने तीन वर्षाच्या वाघाचा मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक ८ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त घटनेस जबाबदार असण्या-या संबधितांवर कारवाई करण्यासह भविष्यात असे प्रकार घडू नये यासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या विशेष व्याघ्र संरक्षण दलाचे दिनांक १२.०४.२०१९ रोजीच्या रात्र गस्तीदरम्यान सापळ्यामध्ये अडकून वाघाचा बछडयाचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

(२) मौजा भामढेळी येथील श्री.ऋषी भिवा नन्नावरे यांनी त्यांचे शेतात लावलेल्या विद्युत प्रवाहामुळे दिनांक ०८.१२.२०१८ रोजी एका वाघाचा (नर) मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

(३) दिनांक १२.०४.२०१९ रोजीच्या प्रकरणामध्ये वनगुन्हा नोंदविण्यात आला असून ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर घटनेच्या संदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच चौकशी दरम्यान १ वनपालास तातडीने निलंबित करण्यात आले असून १ वनरक्षकास कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

दिनांक ०८.१२.२०१८ रोजीच्या प्रकरणामध्ये वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. शेतमालक श्री.ऋषी भिवा नन्नावरे यांची चौकशी सूरु असून सदर घटनेच्या संदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(४) वाघ व इतर वन्यप्राण्यांचे मृत्यू रोखण्याच्या अनुषांगाने वन विभागामार्फत खालील प्रमाणे उपययोजना राबविण्यात येत आहेत:-

- व्याघ्र प्रकल्पात विशेष व्याघ्र संरक्षण दलाची स्थापना करण्यात आली असून त्यांच्या मार्फत रात्रंदिवस गस्त करण्यात येते.
- वन्यप्राण्यांच्या विशेषत: वाघांच्या हालचालींचा मागोवा घेण्याकरीता त्यांचे भ्रमण मार्गाच्या संभावित रस्त्यावर, पानस्थळाजवळ नियमीतपणे कॅमेरा ट्रॅप लावण्यात येतात.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी संरक्षण मनोरे उभारलेले आहेत. संरक्षित क्षेत्रात संरक्षण कुट्यांची उभारणी केली आहे.
- प्रकल्प क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके असून त्याद्वारे वाहनांची तपासणी करण्यात येते
- वनकर्मचा-यांना पिस्तुल / रायफल सारख्या शस्त्रांचा पुरवठा केलेला आहे.

• शिका-याबाबत गोपनियरीत्या माहिती संकलीत करण्यात येते. खबऱ्याला बक्षिस देण्यासाठी गुप्त सेवा निधीची तरतूद केलेली आहे.

• व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वायरलेस यंत्रणा कार्यान्वित आहेत.

• श्वान पथक ठेवण्यात आले असून त्यांच्याद्वारे संशयास्पद ठिकाणी वन्यप्राण्यांचे अवयवांचा अवैध व्यापार, वाहतुक याचा शोध घेण्यात येतो.

• लोकांनी जंगलात जाऊ नये व मानव-वन्यजीव संघर्ष होऊ नये म्हणून उपलब्धतेनूसार गावक-यांना निस्तार दरावर फाटे, बांबू व सरपण उपलब्ध करुन देण्यात येते.

• ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून वनालगतच्या गावातील कुटूंबांना डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनांतर्गत एलपीजी गॅस पुरवठा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुकापूर-पाली देवद (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी उपाययोजना करणेबाबत

**(५०) * १३५०६० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकापूर-पाली देवद (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील कचरा ग्रामपंचायतीमार्फत गाढी नदीच्या पात्रात मोठया प्रमाणात टाकला जात असल्याने दुर्गंधी पसरून तसेच कच-याला लावलेल्या आगीच्या धुरामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायतीकडे कच-याची विल्हेवाट लावण्याची कोणतीही यंत्रणाच नसल्यामुळे कच-याची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी उपाययोजना करण्यासह स्वच्छ भारत अभियानाकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित ग्रामपंचायत अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, ही खरी बाब आहे.
(२) सन २०११ च्या जनगणनेनुसार पाली देवद ग्रामपंचायतीची लोकसंख्या १४,९९० आहे. पाली देवद असेसमेंट सदरी नोंदवलेली कुटुंब संख्या ७,७२७ असून आज रोजीची प्रत्यक्ष लोकसंख्या ४०००० पेक्षा जास्त आहे. पाली देवद ग्रामपंचायत पनवेल महानगरपालिकेलगतची ग्रामपंचायत असल्याने येथे मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेले असल्याने ग्रामपंचायत हद्दीत निर्माण होणा-या कच-याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होणारा घनकचरा ग्रामपंचायतीच्या घंटागाडीमार्फत उचलुन गावालगत असलेल्या गुरचरण जागेतील डंपिंग ग्राऊड मध्ये टाकण्यात येतो. अशा प्रकारे निर्माण होणारा कचरा डंप करण्यासाठी पाली देवद ग्रामपंचायतीकडे गावाबाहेर अन्य ठिकाणी कोणतीही जागा उपलब्ध नाही किंवा ग्रामपंचायतीच्या मालकीचा घनकचरा प्रकल्प नाही. त्यामुळे ग्रामपंचायत हद्दीत निर्माण होणारा घनकचरा पुर्वापार सुरु असलेल्या डंपिंग ग्राउंड मध्ये टाकला जात आहे, ही बाब खरी आहे.
(३) अशा प्रकारे निर्माण होणा-या कच-याचे नियोजन करण्याकरीता घनकचरा प्रकल्प उभारण्याकरीता काही घनकचरा प्रकल्पाची पाहणी ग्रामपंचायतींनी केली आहे. तसेच अशा प्रकारे सेवा देणा-या कंपनीसोबत ग्रामपंचायतींची चर्चा सुरु असून ती अंतिम टप्प्यात आहे. त्यांच्या कडील प्रकल्पास आवश्यक असणारी जागा, प्रकल्प उभारणीसाठी होणारा खर्च, प्रकल्प चालविण्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ याबाबत आवश्यक बाबींची पुर्तता करुन सदरील प्रकल्प लवकरात लवकर उभारणी करण्याची कार्यवाही सुरू असून तशी तरतूद ग्रामपंचायतीने सन २०१९-२० सालातील ग्रामपंचातीच्या वार्षिक अंदाजपत्रकात केलेली आहे.

तसेच ग्रामपंचायत हद्दीत प्लास्टिकचा वापरावर नियंत्रण ठेवण्याकरिता प्लास्टिक बंदी समिती म्हणुन एका समितीची रचना करण्यात आली असुन त्यांच्या मार्फत ग्रामपंचायत हद्दीतील नागरीकांवर तसेच दुकानदारांवर प्लास्टिकच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यात येत आहे.

(४) सदर प्रकरणी ग्रामपंचायत स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील जंगलात व वनक्षेत्र परिसरात आग लागण्याच्या प्रमाणात झालेली वाढ

**(५१) * १३५३९४ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जंगलात व वनक्षेत्रपरिसरात सातत्याने वणवा व इतर कारणामुळे आग लागण्याच्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर (जि.ठाणे) येथे गेल्या चार महिन्यात ११० वणवे पेटल्याने २०० हेक्टर वनक्षेत्र जळून नष्ट झाले असून औषधी वनस्पतीसह शेकडो दुर्मिळ जुनी वृक्ष आगीत जळून खाक झाली आहेत तसेच गणेशखिंड, तडसर-चिंचणी, नेर्ली-तडसर आणि शाळगांव (ता.कडेगांव, जि.सांगली) या चार डोंगरावर एकाच आठवडयात आग लागुन वनसंनदा जळून नष्ट झाली त्याचबरोबर पुणे जिल्हयातील डोणजे, खेड शिवापूर, कोंढणपूर, नांदोशी, कोथरूड वारजे, भांबुर्डा येथील जंगलात वणव्याने लागलेल्या आगीत वन संपदेचे नुकसान झाले असल्याचे माहे मार्च, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, मंगरुळपीर ते अकोला मार्गावरील काटेपूर्णा अभयारण्यात अचानक आग लागल्याने अभयारण्यातील वनसंपदा जळून नष्ट झाली असल्याचे व कोल्हापूर जिल्हयात गेल्या तीन महिन्या ४६६ वणवे लागल्यामुळे जैवविविध संपत्त्तीचे तसेच प्राण्याचे नुकसान झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त घटनांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार भविष्यात आगीमुळे जंगलातील वनसंपदा नष्ट होऊ नये याकरीता वणवा व इतर कारणामुळे लागण्या-या आगीच्या घटना रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात यत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) राज्यातील जंगलात सन २०१८ मध्ये ८४६४ आगीच्या घटना घडल्या असुन सन २०१९ मध्ये माहे एप्रिल २०१९ पर्यंत ५८३१ आगीच्या घटना घडलेल्या आहेत.

(२) शहापूर वनविभागात गेल्या चार महिन्यामध्ये ९३ वनवणव्याच्या घटना घडल्या असून १३५.३५० हे. क्षेत्र बाधित झाले आहे. वणवे हे मुख्यत्वे ग्राउंड फायर प्रकारातील असून यामध्ये जंगलातील वाळलेले गवत व पालापाचोळा जळाला असून वणव्यामध्ये औषधी वनस्पतीसह शेकडो दुर्मिळ जुने वृक्ष जळून खाक झालेले नाही.

सांगली वनविभागातील कडेगांव-पलूस वनपरिक्षेत्रातील मौजे गणेशखिंड, तडसर चिंचणी, नेर्ली तडसर आणि शाळगांव या चार डोंगरावर माहे मार्च २०१९ मधील दुस-या आठवड्यात आगी लागून आगीमुळे वनक्षेत्राचे नुकसान झालेल्या चार घटना घडलेल्या आहेत.

पुणे जिल्हयातील डोणजे, खेड शिवापूर, कोंढणपूर, नांदोशी, कोथरुड वारजे, भांबुर्डा येथील जंगलात वणव्याचे ८ घटनमेध्ये १८ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे. त्यात केवळ गवत व पालापाचोळा जळालेला आहे.

(३) काटेपुर्णा अभयारण्यात माहे एपिल-२०१९ मध्ये आगीच्या ३ घटनेत १४.३२ हे. क्षेत्र बाधीत झाले आहे.

कोल्हापूर जिल्हयात तीन महिन्यात एकूण १४९ आगीच्या घटनेत एकूण ६२९.५ हे. इतके क्षेत्र बाधित झाले आहे.

सदरची आग हि भूपृष्टभाग समतल असल्याने आगीमुळे जंगलातील खुरटी झुडपे व पालापाचोळा, गवत जळीत झाले असून जैवविविधता संपत्तीचे अथवा वन्यप्राण्यांचे नुकसान झालेले नाही.

(४) उक्त घटनांची चौकशी केली असून वनविभागाने ५७ आरोपींचा शोध लावला असून २४ आरोपींना मा. न्यायालयाने दंड भरणेबाबत आदेश दिलेले आहेत.

(५) व (६) वनक्षेत्रात अग्निप्रतिबंधक जाळरेषा घेणे, वॉच टॉवरच्या माध्यमातून आगीवर लक्ष ठेवणे, गस्त करणे अशा प्रकारच्या वनवणवा प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात.

-----------------

## कोकणासाठी स्वतंत्र पर्यटन विकास महामंडळ स्थापनेत होत असलेला विलंब

**(५२) * १३६२९४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणसाठी स्वतंत्र पर्यटन विकास मंडळ स्थापन करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी ३०५५ कोटींचा आराखडा एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या माध्यमातून कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी जाहीर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकण विकासाच्या योजना मार्गी लावण्यासाठी समन्वय म्हणून सनदी अधिकारी यांची नियुक्त करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार कोकणसाठी स्वतंत्र पर्यटन विकास मंडळ स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१), (२) व (३) होय.

(४) व (५) राज्याच्या पर्यटनाच्या वाढीसाठी पर्यटन विकासाचे प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने पर्यटन संचालनालय स्थापन करण्यात आलेले असून कार्यान्वित करण्यात आलेले आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत पर्यटन संचालनालयामार्फत कोकण पर्यटनास चालना देण्याबाबतचे प्रकल्प प्राधान्याने हाती घेण्यात येणार असून, कोकण पर्यटन विकास महामंडळ वेगळ्याने स्थापन करण्याबाबत प्रस्ताव शासनास पुनर्विचारार्थ सादर करण्यात आला आहे.

-----------------

## समुद्राच्या उधाणामुळे शेतपिकांचे व शेतजमिनीचे नुकसान होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक बंधारे बांधण्याबाबत

**(५३) * १३४९६७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्राच्या उधाणामुळे शेतपिकांचे व शेतजमिनीचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची तसेच समुद्राच्या उधाणाचे पाणी शेतात शिरु नये यासाठी प्रतिबंधात्मक बंधारे बांधण्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याची घोषणा मा.खारभूमि विकास मंत्री यांनी दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदर योजना प्रत्यक्षात केंव्हापासून अंमलात आणण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदर योजना प्रत्यक्षात अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) दिनांक ०५/०३/२०१९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीतील विषय क्र. २१ मध्ये "समुद्रातील उधान या स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिकांचे व शेत जमिनीचे नुकसान झाल्यामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत" या विषयावरील महसूल व वन विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाचा निर्णय खालीलप्रमाणे आहे.

"खारभूमी विकास योजनेंतर्गत खारभूमी बंधारे पूर्ण झाले तर समुद्राच्या उधाणामुळे शेती पिक नुकसान होणार नाही व वारंवार नुकसान भरपाई देण्याची गरज भासणार नाही. शिवाय शेतीसाठी पुन:प्रापित क्षेत्र देखील वाढेल. त्यामुळे खारभूमी बंधारे कार्यक्रमासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षी मंजूर असलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये रु.१००.०० कोटी इतक्या रक्कमेची वाढ जून, २०१९ मध्ये विभागास पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी. जलसंपदा (खारभूमी) विभागाने या उपलब्ध होणाऱ्या वाढीव तरतूदीच्या अनुषंगाने घ्यावयाच्या कामाचे नियोजन करावे व अंमलबजावणी करावी."
(२) खारभूमी विकास योजनेंतर्गत खारभूमी बंधारे बांधणे, खारभूमी योजनेचे नुतनीकरण, देखभाल, दुरुस्तीची कामे हाती घेणे इत्यादि कामे पूर्ण करुन समुद्राच्या पाण्यामुळे शेती पिकांचे नुकसान होवू नये यासाठी सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये भरीव तरतुद करण्यात आली असून वरीलप्रमाणे कामे सुरु करण्याचे नियोजन आहे.

(३) खारभूमी विकास योजनांसाठी सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठी एकूण रु.६०.०० कोटी रकमेची योजना तयार करण्यात आली असून त्यानुषंगाने १/३ रक्कम लेखानुदान मंजूर केले आहे.

तसेच मंत्रीमंडळ निर्णयाच्या अनुषंगाने मान्य करण्यात आलेल्या रुपये १००.०० कोटी वाढीव तरतूदीपैकी रु.४०.०० कोटी इतक्या निधीची मागणी जून-२०१९ च्या पावसाळी अधिवेशनात करण्यात आली आहे. तद्नंतर आवश्यकतेनुसार सन २०१९ च्या हिवाळी अधिवेशनात उर्वरित रु.६०.०० कोटी निधीची मागणी करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात निधी अभावी रोजगार हमी योजनेची कामे बंद असल्याबाबत

**(५४) * १३८०१८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकुर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी),**

**श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेच्या कामांचा निधी माहे ऑक्टोबर, २०१७ पासून बंद झाल्याने राज्यभरात सुरु असलेली रोजगार हमी योजनेची सुमारे १४ हजार ७४० कामे बंद झाली असून मंजूरी मिळालेल्या १३ हजार ९०२ कामांना अद्यापपर्यंत सुरूवात करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०१७-१८ मध्ये रोजगार हमी योजनेतंर्गत कामावरील अकुशल मजूरांची रक्कम पूर्ण देण्यात आलेली नाही तसेच गिट्टी, मुरूम, डब्बर या साहित्य देयकाची रू.३९७ कोटीचा निधी अद्याप देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील दृष्काळी भागातील मजूरांना रोजगार हमी योजनेमधून काम मिळणे अशक्य झाले असल्यामुळे मजूर बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रोजगार हमी योजनेतंर्गतची कामे तात्काळ सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही. तथापि, म.गां.रा.ग्रा. रोजगार हमी योजनेच्या कामाचा आराखडा ग्रामपंचायत पातळीवर ग्रामसभेद्वारे ठरवला जाऊन त्यास जिल्हा परिषदेच्या विशेष सभेद्वारे मान्यता प्रदान केली जाते. गावनिहाय कामाचा शेल्फ ठेवला जातो. म.गां.रा.ग्रा. रोजगार हमी योजनेची कामे मजुरांच्या मागणीनुसार काढली जातात. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर विविध योजनाच्या अभिसरणामधून योजना राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील गोदमगांव ते अंचोली, हिप्परगा (जाने), कृष्णुर, बरबडा, टाकळी या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(५५) * १३८४२३ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत गोदमगांव ते अंचोली, हिप्परगा (जाने), कृष्णुर, बरबडा, टाकळी या २२ कि.मी. रस्ता सुधारण्याचे काम दिनांक २२ सप्टेंबर, २०१८ रोजी पर्यंत पुर्ण होणे आवश्यक असतांनाही अद्याप अर्धेकाम सुध्दा झाले नसून कामाचा दर्जाही अतिशय निकृष्ट असून पुल, मो-या बांधकामात रेतीऐवजी सिल्कोटचा वापर करण्यात येत असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार मुदतीत काम पुर्ण न करता निकृष्ट दर्जाचे काम करणा-या कंत्राटदारावर व कंत्राटदाराशी संगनमत करणाऱ्या संबधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सदर कामास विलंब झाला आहे, हे खरे आहे. तथापि काम निर्धारित गुणवत्तेनुसार करण्यात येत असून काम त्वरीत पुर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२), (३) व (४) काम निर्धारित गुणवत्ता मानकानुसार होत असल्याने अधिकाऱ्यावर कार्यवाही अपेक्षित नाही.

तथापि, कामास होणाऱ्या विलंबासाठी ठेकेदारास दंड आकारण्यात आला आहे.

-----------------

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील प्रकल्पाचे विस्तार व सुधारणा करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाबाबत

**(५६) * १४०९३० श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील खडकवासला प्रकल्पाच्या जलसंपदा विभागातील प्रकल्पाचे विस्तार व सुधारणा करण्यासाठी सुमारे ४३ कोटी रुपयांचे अंदाजपत्रके सादर करण्यात आली असून खर्चाची मर्यादा अत्यल्प असल्यामुळे त्याला निधी उपलब्ध झाला नव्हता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यापूर्वी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०१८ / प्र. क्र ५१८ / १७ /सिंव्य (कामे) या शासन निर्णयानुसार जलसंपदा विभागाच्या विद्यमान प्रकल्पाचे विस्तार व सुधारणा/ विशेष दुरुस्ती अंतर्गत करावयाच्या कामांसाठी उपलब्ध योजनांतर्गत (Plan) अनुदानाच्या २ टक्के इतक्या मर्यादेत वाढ करून, १० टक्के करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कामांच्याबाबत सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाना मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र. ५५१/१७/सिंव्य (कामे), दि.२७/११/२०१८ नुसार जलसंपदा विभागाच्या विस्तार व सुधारणा / विशेष दुरूस्ती अंतर्गत करावयाच्या कामासाठी उपलब्ध योजनांतर्गत (प्लॅन) अनुदानाच्या २% इतक्या मर्यादेत वाढ करून १०% करण्यास मंजूरी दिलेली आहे. सदर शासन निर्णयामधील तरतूदीनुसार विशेष दुरूस्तीकामांना

शासनाची प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी शासनास सादर करावयाच्या कामांच्या प्राधान्यक्रम यादीस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ९९ व्या बैठकीतील ठराव क्र.९९/५ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये सदर कामांचा समावेश आहे.

राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या निकषानुसार सुधारीत अंदाजपत्रके तयार करून प्रशासकीय मान्तेसाठी शासनास सादर करावयाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या तोटयात होणारी वाढ

**(५७) * १३५२८६ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या १८ हजार गाडयांपैकी ५ हजार ४०० गाडया जीर्णावस्थेत असल्याने सदर गाडया भर रस्त्यातच बंद पडण्याच्या प्रमाणात वाढ झाली असून प्रवाश्यांची गैरसोय होत असल्याने प्रवासी खाजगी वहातूकीने प्रवास करीत असल्याने महामंडळाचे नुकसान होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या वाहकांच्या हलगर्जीपणा आणि फुकट प्रवास करण्या-या प्रवाशांमुळे महामंडळाला वर्षाला सुमारे ५०० कोटी रुपयांचा तोटा होत असल्याची बाब महामंडळाच्या सुरक्षा-दक्षता विभागाने केलेल्या सर्वेक्षणाच्या अहवालावरुन माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाचा सन २०१४-१५ मधील तोटा ३९१ कोटीं इतका असून सदर तोटा सन २०१८-१९ मध्ये ९६५ कोटीं इतका झाला असून मागील पाच वर्षात तोटा तिप्पट झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्येदरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या गाडयांनी प्रवास करण्या-या प्रवाश्यांच्या संख्येत १९ लाखाने घट झाली असून महामंडळाला होणारा तोटा कमी करण्यासाठी तिकीटाच्या दरात १८ टक्के वाढ केलेली असतांनाही औरंगाबाद न्यायालयाने सन २००२ मध्ये अवैध वाहतुकीवर बंदी आणण्याचा दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या तोटयात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महामंडळाला होणारा तोटा कमी करण्यासह प्रवाशांना अत्याधुनिक सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

(३) राज्य परिवहन महामंडळास सन २०१४-१५ मध्ये रु.३९१.०१ कोटी तोटा झालेला होता. आर्थिक वर्ष २०१७-१८ अखेर कामगारांना वेतनवाढ दिल्यामुळे रु.१५७८.६८ कोटी तोटा झालेला आहे. सदर बाब सन २०१७-१८ चे वार्षिक लेखे तयार झाल्यानंतर निदर्शनास आलेली आहे. आर्थिक वर्ष सन २०१८-१९ चे वार्षिक लेखे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) राज्य परिवहन महामंडळाने जून २०१८ मध्ये केलेली भाडेवाढ ही प्रवाशी संखेत घट झाल्यामुळे केलेली नसून, डिझेल, टायर संच, चासीज तसेच महागाई भत्ता यांचे दरामध्ये वाढ झाल्याने केलेली आहे.

औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अवैध प्रवाशी वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून परिवहन अधिकारी व पोलीस यंत्रणा यांच्या संयुक्त पथकाद्वारे तपासणी करण्यात येते.

(५) राज्य परिवहन महामंडळास होणारा तोटा कमी करण्यासाठी व प्रवाशांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात या अनुषंगाने सन २०१७-१८ पासून महामंडळाने स्वमालकीच्या ५०० वातानुकूलीत शिवशाही बसेस चालनात आणल्या असून, सन २०१९-२० मध्ये स्वमालकीच्या ४०० वातानुकूलीत शिवशाही, विना वातानुकूलीत आसन व शयन प्रकारच्या २०० व ७०० नवीन साध्या बसेस चालनात आणण्याचे नियोजन केलेले आहे. तसेच, ४०० वातानुकूलीत शिवशाही बसेस भाडेतत्वावर घेण्यात येत आहेत.

राज्य परिवहन महामंडळाने २५० आगारे व ३३६ बसस्थानकांवर संगणकिकृत वेब आधारीत आगाऊ तिकीट आरक्षण सुविधा व २६८ अधिकृत खाजगी एजंटद्वारे आगाऊ आरक्षण सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच, अतिसंवेदनशील बसस्थानकांवर ३२३ सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविण्यात आलेली आहेत.

राज्यातील वर्दळीच्या १३ ठिकाणी असलेल्या बसस्थानकांचे “खाजगी सार्वजनिक सहभागातून” बसतळ, तसेच राज्यातील रस्त्यांलगत प्रवाशांसाठी सुमारे ११०० मार्गनिवारे उभारणे प्रस्तावित आहे.

राज्य परिवहन बसेसचे निश्चित ठिकाण समजण्यासाठी व्हीटीएस प्रकल्प कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच, महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर महामंडळाद्वारे प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सर्व सेवा-सुविधांबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पर्यटन विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक यानी केलेला गैरव्यवहार

**(५८) * १३५६०२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अतुल**

**भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील प्रस्तावित पंचतारांकित हॉटेलांना लिज वाढवून देण्याच्या प्रकरणात पर्यटन विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक यांचा निलंबनाचा प्रस्ताव विचाराधीन असताना याच अधिकाऱ्याने सन २०१८ च्या दिवाळीच्या कालावधीत नियमबाह्यरित्या खरेदी केलेल्या १४ लाख रुपयांच्य भेट वस्तु पर्यटन विभागाच्या प्रधान सचिवांची मान्यता न घेता परस्पर पुरविण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करण्याचे आदेश दिले असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पर्यटन विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१), (२) व (३) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत दिवाळी भेट वस्तू खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आल्याने त्याबाबत वित्तीय गैरवर्तनामध्ये समाविष्ट असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबत दिनांक १८.४.२०१९ च्या पत्रान्वये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास कळविण्यात आले आहे. त्याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील विर्डी धरणाचे काम तीन वर्षापासून बंद असल्याबाबत

**(५९) * १३८७०१ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील विर्डी धरणाचे काम कोकण पाटबंधारे जलसंपदा विभाग यांच्या माध्यमातून करण्यात येत असून सुरुवातीला या धरणाचा अंदाजित खर्च ५४ कोटी इतका होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विर्डी धरणाचे काम मागील ३ वर्षापासून संपूर्णतः बंद असल्याने विर्डी, तळेखोल, आयी, माटणे, आंबडगाव, वझरे, गिरोडा ही गावे सिंचन व पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू धरणाच्या कामाची सद्यस्थिती काय आहे व आतापर्यंत पूर्ण झालेल्या कामावर प्रत्यक्षात किती रक्कम खर्च करण्यात आली आहे, तसेच धरणाचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

दोडामार्ग तालुक्यातील विर्डी धरणाचे काम कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे (जलसंपदा) यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

सुरुवातीला या प्रकल्पाचा अंदाजित खर्च प्रशासकीय मान्यतेनुसार रु.४३.६८ कोटी इतका होता.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

महादयी पाणी तंटा लवाद व त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयात प्रकल्प न्यायप्रविष्ट असल्याने मागील ३ वर्षापासून प्रकल्पाचे काम बंद आहे. त्यामुळे पाणीसाठा न झाल्याने प्रकल्पाचे लाभक्षेत्रात येणारी विर्डी, तळेखोल, आयी, वझरे व गिरोडे या गावांना या प्रकल्पातून पाणी उपलब्ध झालेले नाही.

परंतु, माटणे व आंबडगाव ही गावे प्रकल्पाचे लाभक्षेत्रामध्ये येत नसल्याने त्याच्या बाबतीत हा प्रश्न उद्भवत नाही.

(३) नाही.

(४) सदरहू प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु १४५.९९ कोटी इतकी असून प्रकल्पावर माहे मार्च, २०१९ अखेर रु.६९.७९ कोटी इतका खर्च झाला आहे.

१. माती धरणाचे मातीकाम ६०% पूर्ण आहे.

२. सांडव्याचे खोदकाम ४०% पूर्ण आहे.

३. सिंचनासह जलविद्युत बोगदा विमोचकाच्या बोगद्याचे व आपत्कालीन विहीरीचे खोदकाम १००% पूर्ण आहे.

महादयी पाणी तंटा लवादाच्या दि.१४/०८/२०१८ रोजी जाहीर केलेल्या निवाडयानुसार, विर्डी प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या सर्व वैधानिक मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यात सूर्या प्रकल्पांतर्गत असलेल्या कवडास कालव्याची झालेली दुरवस्था

**(६०) * १३९३४२ श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात सूर्या प्रकल्पांतर्गत असलेल्या कवडास धरणाच्या उजव्या कालव्याची दुरवस्था झाली असून ठिकठिकाणी पाणी गळती होत असल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर कालव्याची तात्काळ दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय.

सूर्या कालव्याची बांधकामे ३० ते ३५ वर्षे जूनी आहेत. मोठ्या प्रमाणावर पडणा-या पावसामुळे वितरण प्रणालीतील मुख्य कालवे, शाखा कालवे तसेच वितरीका, लघुपाट, उपलघुपाटाचे मातीकामातील भराव व बांधकामे काही प्रमाणात क्षतिग्रस्त झालेले आहेत.
(३) सूर्या उजवा तीर कालव्यांसाठीची क्षतिग्रस्त झालेल्या बांधकामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून सन २०१९-२० साठीची प्रापणसूची क्षेत्रिय स्तरावर तयार करण्यात आली असून प्रापणसूचीस मंजूरी घेऊन सन २०१९-२० च्या सिंचन हंगामापूर्वी सदरची कामे पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परिवहन विभागात वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देण्यात होत असलेले गैरप्रकार

**(६१) * १३५२८४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा (मुंबई) येथील परिवहन विभागात दलाल (एजंट) कडूनच वाहनांची तपासणी करुन योग्यता प्रमाणपत्र देण्यात येत असल्याने प्रवाशांच्या सुरक्षेची बाब दुर्लक्षित करण्यात येत असल्याची बाब दिनांक १६ मार्च, २०१९ रोजी वा सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे प्रकार राज्यातील अन्य परिवहन विभागात होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर यापूर्वीही ५३ अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकृत व्यक्तींकडूनच वाहनाच्या कामकाजासंदर्भातील कागदपत्रे स्वीकारावी अनधिकृत व्यक्तींकडून कागदपत्रे स्वीकारल्यास कारवाई करण्यात येईल असे आदेश प्रादेशिक परिवहन अधिकारी, वडाळा यांनी माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करुन वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देण्यास निष्काळजीपणा करण्या-या संबंधितांवर कारवाई करण्यासह दलालांकडून होणरे वाहन तपासणीचे प्रकार रोखण्यासठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अशा स्वरूपाची बातमी वृत्तपत्रामध्ये दि.१६ मार्च,२०१९ रोजी प्रसिध्द झाली आहे.

(२) मा.मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.२८/२०१३ मध्ये दिलेल्या आदेशानुसार करण्यात आलेल्या तपासणीमध्ये राज्यातील ६ उप/ प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये वाहनांची नियमानुसार काटेकोरपणे तपासणी न करता वाहन योग्यता प्रमाणपत्र दिल्याचे आढळल्याने संबंधित ५२ अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) याप्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीमध्ये दलालाकडून तपासणी केल्याचा प्रकार निदर्शनास आलेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विर्डी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) धरणामुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करणेबाबत

**(६२) * १३८७०३ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विर्डी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) धरणामुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या कुटुंबाचे आजमितीस पुनर्वसन झालेले नसल्याने सदरहु प्रकल्पग्रस्तांनी विनाविलंब पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी मा. जलसंपदा मंत्री, मा.पुनर्वसन मंत्री, मा.पालकमंत्री सिंधुदुर्ग जिल्हा, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, जिल्हा पुनर्वसन अधिकारी आदींकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसन गावठाणात रस्ते, वीज, पाणी, शाळा, समाजमंदिर आदी सोयीसुविधा आजमितीस उपलब्ध करून दिलेल्या नसुन त्यांच्या मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने धरणग्रस्तांनी ३ वेळा उपोषणही केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन विर्डी धरणग्रस्तांचे तात्काळ योग्यरीतीने पुनर्वसन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

प्रकल्पग्रस्तांना दि. २०/०४/२०१८ रोजी भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत.

प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या मागण्यांसाठी विविध स्तरावर निवेदने सादर केली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

पुनर्वसन गावठाणातील भूखंडाचे सन २०१८ मध्ये प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आले आहे.

विविध मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्तांनी दिनांक २९.०३.२०१७ व ११.०४.२०१७ असे २ वेळेस उपोषण केले आहे.

प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन प्रगतीपथावर असून पुनर्वसनांतर्गत देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांपैकी बहुतांश सोयी सुविधांची कामे पूर्ण झाली असून उर्वरीत सोयी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) विर्डी धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने पुनर्वसनांतर्गत देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांपैकी बहुतांश सोयीसुविधांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित सोयीसुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध निधीनुसार पुनर्वसन कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.